

आनंद सागर
मंगल कार्यालय
शाकाहारी करिता
एका मंगलमय कार्यासाठी लागणारी सर्व प्रकारची सेवा एकाच छताखाली. आता आनंद सागर मंगल कार्यालय येथे रात्रीच्या कार्यक्रमासाठी भव्य लॉन्स उपलब्ध.
* लग्न सोहळा * साखरपूडा * रिसेप्शन * वाढदिवस
* गेट टुगेदर * कॉन्फरन्स * सांस्कृतिक कार्यक्रम
आसना बायपास चौरस्ता, गोरक्षण, जवळ, देशमुख गॅस पंपासमोर कामठा (बु.) नांदेड
व्यवस्था: स्वागत मंडप डेकोरेटर्स, मो. 9325610507,7972904719



# गोदातीर समाचार

RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026
संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com



जोशी बंधू यांचे ..!!
शंकर भट्ट मंगल कार्यालय

मंगल कार्यासाठी लागणारी सर्व प्रकारची सेवा एकाच छताखाली आपल्या सेवेत..!!
(लग्न, साखरपुडा, मुंज, रिसेप्शन, वाढदिवस, बारसे, डोहाळ जेवण, स्वागत समारोह व ईतर...)
पत्ता : भगवान परशुराम चौक किनवट रोड भोकर मो. क्र. 9765983335/9960659975/9881881934/9527889927



* वर्ष ६४ वे * अंक १०५ * नांदेड * सोमवार, दि. २१ एप्रिल २०२५ * पृष्ठे ६ * किंमत २ रुपये ☎: 255777, Fax :252211


## तापमानाचा भडका! उपराजधानीत ४४.७ अंश, परभणीत ४३.६ अंश



### उष्णतेची लाट, वादळी वारा आणि गारपीटही!

राज्यातील हवामानात सातत्याने बदल जाणवत आहे. एप्रिलच्या मध्यावर राज्यातील काही ठिकाणी तापमान ४५ अंशांवर गेलं आहे. विदर्भात उष्णतेची लाट असतानाच राज्यात पुन्हा नवं संकट घोंघावत आहे. आज दि. २१ एप्रिल रोजी मराठवाड्यातील काही ठिकाणी वादळी वारा आणि विजांच्या कडकडाटासह गारपीट होण्याची शक्यता आहे. आज मराठवाड्यातील छत्रपती संभाजीनगर, जालना, बीड या ३ जिल्ह्यांत उष्ण आणि दमट वातावरण जाणवण्याची शक्यता आहे. तर विदर्भातील अकोला आणि नागपूर या दोन शहरांना पुढील २ दिवस हीट वेव्हचा इशारा देण्यात आला आहे. त्यामुळे तेथील नागरिकांनी दुपारच्या वेळी बाहेर पडणे टाळावे लागणार आहे.

**मुंबई (प्रतिनिधी)–** राज्यात सगळ्याच भागात तापमानाने नागरिक हैराण झाले आहेत. उष्णतेचा पारा टोक गाठत असल्याचे चित्र आहे. रविवारी विदर्भ मराठवाडा प्रचंड तापला आहे. बहुतांश ठिकाणी ४०-४५ अंश सेल्सियसच्या नोंदी होत आहेत. आयएमडीने नोंदवलेल्या कमाल तापमानानुसार, रविवारी राज्याच्या उपराजधानीत नागपुरात तब्बल ४४.७ अंश सेल्सियसची नोंद करण्यात आली आहे. हे राज्यातील सर्वाधिक तापमान आहे.

अकोल्याचा पारा ४४.३ अंश सेल्सियसवर आहे तर संपूर्ण विदर्भाचे तापमान ४० अंश सेल्सियसच्या पुढे आहे. मराठवाडाही चांगलाच तापला असून परभणीत ४३.६ अंश तर बीड ४२ अंशांवर स्थिरावले आहे. संपूर्ण कोकणपट्ट्यात तसेच मुंबई व मुंबई उपनगरात प्रचंड उकाडा जाणवतोय. उन्हाचा चटका असह्य झाला आहे. येत्या पाच दिवसांत सिंधूदुर्ग, कोल्हापूर, सोलापूर सांगलीत हलक्या पावसाची शक्यता वगळता अन्य कुठेही पावसाची शक्यता नसल्याचा हवामान विभागाचा अंदाज आहे.

आजपासून येत्या तीन दिवसांत मध्य महाराष्ट्र व मराठवाड्यातील काही जिल्ह्यांना उष्ण व दमट हवामानाचा यलो अलर्ट देण्यात आला आहे. बीड, लातूर, धाराशिव जिल्ह्यांमध्ये प्रचंड उष्ण हवामान राहणार आहे. तर पुणे, सोलापूर जिल्ह्यातही आज उष्ण व दमट हवामानाचा इशारा देण्यात आलाय. २१ एप्रील रोजी छत्रपती संभाजीनगर, जालना, बीड, अकोला, नागपूरमध्ये उष्णतेचा यलो अलर्ट देण्यात आला आहे. किमान तापमनाचा पाराही सध्या सामान्यहून अधिक असल्याने मुंबई व उपनगरात रविवारी पारा अधिक नोंदवण्यात आला.

नागपूर ४४.७ अंश, परभणी ४३.६ अंश, चंद्रपूर ४४.० अंश, ब्रम्हपुरी ४३.६ अंश, वर्धा ४३.० अंश, गोंदिया ४४.० अंश, अमरावती ४३.८ अंश, यवतमाळ ४२.५ अंश, वाशीम ४१.८ अंश, अकोला ४३.५ अंश, बुलढाणा ४०.० अंश, औरंगाबाद ४१.७ अंश, जळगाव ४१.७ अंश, लातूर ४१.२ अंश, बीड ४२.६ अंश, हिंगोली ४२.१ अंश, पुणे ३९.४ अंश, नाशिक ३७.३ अंश, सातारा ३९.७ अंश, सांगली ३७.१ अंश, मुंबई उपनगर ३३.० अंश, मुंबई शहर ३३.४ अंश, ठाणे ३६.० अंश, पालघर ३५.२ अंश, रत्नागिरी ३२.९ अंश, सिंधुदुर्ग ३२.० अंश असा पारा रविवारी राज्यातील जिल्ह्यांमध्ये पहावयास मिळाला.

## महाराष्ट्रात पाणीटंचाईच्या झळा! उजनी शुन्यावर, जलसाठ्यांत मोठी घट



**मुंबई (प्रतिनिधी)–** राज्यातील धरणसाठा आता ३८.९५ टक्क्यांवर आला आहे. पुणे, छत्रपती संभाजीनगर, कोकण, विदर्भातील सर्व मोठ्या धरणांचा पाणीसाठा आता झपाट्यानं खाली घसरलाय. एकीकडे तापमानाच्या झळा आणि दुसरीकडे पाणीटंचाई अशा दुहेरी कात्रीत राज्यातील बहुतांश भागातील नागरिक सापडले आहेत. अकोल्यात पाणी चोरीला जाऊ नये म्हणून पाण्याच्या टाक्यांना कुलूप लावले जात आहेत. मराठवाड्यात १०-१२ दिवसांनी एकदा नळाला पाणी येतानाचे चित्र पुन्हा सुरु झाले आहे. छत्रपती संभाजीनगरमध्ये पाण्याच्या नियोजनावरून नागरिकांमध्ये रोष दिसून येत आहे. राज्यभरात पाणीटंचाईचा प्रश्न चांगलाच पेटला आहे.

मराठवाड्यातील जायकवाडी धरणात सध्या ४४.९३% पाणीसाठा शिल्लक आहे. बीड मधील मांजरा धरण ३५ टक्क्यांवर जाऊन पोहोचले आहे तर माजलगाव धरणात २०.४०% पाणीसाठा शिल्लक आहे. हिंगोलीतील सिद्धेश्वर आणि येलदरी धरण ४८.८३% व ५७.५६% अनुक्रमे आहेत. नांदेडच्या विष्णुपुरी धरणात ३३.४२% पाणीसाठा आता शिल्लक आहे.

महाराष्ट्राच्या सहा महसूल विभागांपैकी पुणे, छत्रपती संभाजीनगर आणि नागपूर या तीन विभागातील धरणांमध्ये आता ४० टक्क्यांहूनही कमी पाणी शिल्लक आहे. पुणे विभागात राज्यातील सर्वात कमी पाणीसाठा आहे. गेल्या वर्षीच्या तुलनेत काही टक्क्यांनी पाणीसाठा अधिक असला तरी काही प्रमुख धरणे एप्रीलमध्यावरच मायनसच्या दिशेने वाटचाल करू लागली आहेत. त्यामुळे शेतीच्या पाण्यासह पिण्याच्या पाण्याची चिंता व्यक्त केली जात आहे. गेल्या वर्षी याच सुमारास पाणीसाठा ३३.६२% एवढा होता. तो यंदा ३८.९५% एवढाच राहिला आहे.

राज्यात पुणे विभागातील लघु मध्यम आणि मोठ्या एकूण ७२० धरणांमध्ये आता केवळ ३२.७०% पाणीसाठा शिल्लक आहे. खडकवासला धरण ५१.१२ टक्क्यांवर भरले असून त्यात सध्या २८.५८ दलघमी उपयुक्त पाण्यासाठी आहे. पानशेत धरणात ३४.१०% पाणीसाठा शिल्लक आहे. सांगलीतील वारणा धरण ४०.५६ टक्क्यांवर येऊन पोहोचले आहे. साताऱ्यातील कोयना ३७.२२ टक्क्यांवर आहे. तर सोलापूरमधील उजनी धरण आता शून्यावर पोहोचले आहे. कोल्हापुरातील दूधगंगा २६.४८ टक्क्यांवर असून राधानगरी धरण ५४ टक्क्यांवर आहे.

## कर्नाटकचे माजी पोलीस महासंचालक ओम प्रकाश यांची हत्या, पत्नीवर संशय



**मुंबई (प्रतिनिधी)–** कर्नाटक पोलिसाचे निवृत्त महासंचालक ओम प्रकाश (वय ६८) यांची हत्या करण्यात आली आहे. बंगळुरुतील त्यांच्या घरामध्ये रक्ताच्या थारोळ्यात त्यांचे प्रेत आढळले. ओम प्रकाश यांची हत्या ही कौटुंबिक वादातून झाली असल्याची प्राथमिक माहिती आहे. त्यांच्या पत्नीनेच त्यांची हत्या केल्याचा संशय पोलिसांना आहे. या घटनेमुळे कर्नाटकच्या पोलिस दलात मात्र खळबळ उडाल्याचं चित्र आहे.

ओम प्रकाश हे १९८१ बॅचचे आयपीएस अधिकारी असून २०१५ ते २०१७ या काळात कर्नाटक राज्याचे पोलिस महासंचालक होते. पल्लवी असं त्यांच्या पत्नीचं नाव असून तिनेच ओम प्रकाश यांची हत्या केल्याचा पोलिसांना संशय आहे. पोलिसांनी ओम प्रकाश यांच्या पत्नीला ताब्यात घेतलं असून तिची चौकशी सुरू आहे.

निवृत्त झाल्यानंतर ओम प्रकाश हे बंगळुरुमध्येच राहायला होते. त्यांच्या पत्नीसोबत त्यांचा वाद सुरू होता. त्यांची पत्नी मानसिक रुग्ण असल्याचीही माहिती समोर येत आहे. रविवारी संध्याकाळी ओम प्रकाश हे त्यांच्या घरी रक्ताच्या थारोळ्यात पडल्याचं समोर आलं. या घटनेची माहिती ओम प्रकाश यांच्या पत्नीनेच पोलिसांना दिली.

## सोलापूरचे प्रसिद्ध न्युरोसर्जन डॉ. शिरिष वळसंगकरांच्या आत्महत्येप्रकरणी रूग्णालयातील महिला गजाआड

**सोलापूर (प्रतिनिधी)–** सोलापुरातील प्रसिद्ध न्यूरो फिजिशियन डॉक्टर शिरीष वळसंगकर आत्महत्या प्रकरणातील आरोपी महिलेला ३ दिवसांची पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे. दि. १८ एप्रिल रोजी डॉक्टर वळसंगकर यांनी बंदुकीच्या गोळ्या झाडत स्वतःला संपवले. या घटनेमुळे मोठी खळबळ उडाली होती. आत्महत्येला प्रवृत्त केल्याप्रकरणी या महिलेवर गुन्हा दाखल करण्यात आला होता. दरम्यान सोलापूर सत्र आणि दिवाणी न्यायालयात महिलेचा दाखल केले होते. त्यावेळी न्याय दंडाधिकारी दीपक कंखरे यांनी आरोपी महिलेस २३ एप्रिलपर्यंत कोठडी सुनावली आहे. कामावरून काढल्याने आरोपी मनीषा माने हिने डॉक्टर वळसंगकर यांना स्वतः आत्महत्या करण्याची धमकी दिल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. (पान ३ वर...)

**डॉ. वळसंगकर कर्मचाऱ्याकडून धमकी मिळाल्याने तणावाखाली**

डॉ. वळसंगकरांना रुग्णालयातील सर्व आर्थिक व्यवहार हे कागदोपत्रांवरती हवे होते. त्यासाठी त्यांचा आग्रह देखील होता, पण आजकाल रुग्णांकडून उपचाराची रक्कम कोणतीही नोंद न करता स्वीकारली जात होती. यासंदर्भात त्यांनी आक्षेप नोंदवला होता. पण त्यांचं कोणी ऐकत नव्हतं. जी महिला कर्मचारी अशी रक्कम स्वीकारत होती, तिला डॉ. वळसंगकरांनी कामावरून देखील काढलं होतं. पण नंतर या महिला कर्मचाऱ्याने कामावरून काढल्यानंतर आत्महत्या करण्याची धमकी डॉक्टरांना दिली होती. तिच्या धमकीवरून डॉक्टरांना पोलिसांत तक्रार दाखल करण्याचा सल्ला दिला होता. मात्र, डॉक्टरांना ते मान्य नव्हते. या प्रकरणामुळे डॉक्टर तणावाखाली होते.

## जम्मू-काश्मीरमध्ये ढगफुटीने हाहाःकार; तीन जणांचा मृत्यू

**श्रीनगर (प्रतिनिधी)–** गेल्या काही दिवसांपासून जम्मू-काश्मीरमध्ये पाऊस पडत आहे. रविवारी सकाळी रामबन जिल्ह्यातील सेरी बागना भागात पावसानंतर झालेल्या ढगफुटीत तीन जणांचा मृत्यू झाला. पोलिसांनी सुमारे १०० जणांना वाचवले. ढगफुटीमुळे अचानक पूर आला. डोंगरावरून आलेला ढिगारा गावांकडे आला आणि अनेक लोक आणि घरांना धडकला. सध्या बचावकार्य सुरू आहे.

दुसरीकडे, रामबन जिल्ह्यातील बनिहाल परिसरात अनेक ठिकाणी भूस्खलनाच्या घटना घडल्या आहेत. यामुळे जम्मू-श्रीनगर राष्ट्रीय महामार्ग बंद करण्यात आला आहे. शेकडो वाहने अडकली आहेत. किश्तवार-पद्दर रस्ता देखील बंद आहे. येथे वाहनांची वाहतूक थांबवण्यात आली आहे. हवामान स्वच्छ झाल्यानंतरच महामार्गावरून प्रवास करण्याचे आवाहन अधिकाऱ्यांनी केले आहे. भूस्खलनाचे काही व्हिडिओ समोर आले आहेत, ज्यामध्ये डोंगरावरून ढिगारा पडताना दिसत आहे.

## उद्धव ठाकरे-राज ठाकरे एकत्र येण्याच्या प्रश्नावर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे चिडले



**मुंबई (प्रतिनिधी)–** मनसेप्रमुख राज ठाकरे आणि शिवसेना ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे हे ठाकरे बंधू एकत्र येणार का?, याची चर्चा राजकारणात नेहमी होते. आता खुद्द दोन्ही ठाकरे बंधूंनी यासाठी एकेक पाऊल पुढे टाकलं आहे. राज ठाकरेंनी एका मुलाखतीत उद्धव ठाकरेंसमोर टाळीसाठी हात पुढे केला आणि उद्धव ठाकरेंनी लागलीच त्यांना प्रतिसादही दिला. उद्धव ठाकरेंच्या या साद-प्रतिसादामुळे राज्यातल्या राजकारणाला नवी कलाटणी मिळण्याची शक्यता आहे.

राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे एकत्र येण्यावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यापासून उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह महाराष्ट्रातील राजकीय पक्षाच्या अनेक नेत्यांनी प्रतिक्रिया दिली. दोन ठाकरे बंधू एकत्र आले तर स्वागतच आहे, असं सर्वजण म्हणताना दिसले. मात्र याचवेळी राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे एकत्र येण्याच्या प्रश्नावर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे चांगलेच चिडल्याचे दिसून आले.

एकनाथ शिंदे सध्या साताऱ्यातील त्यांच्या दरे गावात आहे. एकनाथ शिंदेंकडून यावेळी काही कामांची पाहणी सुरु होती. यादरम्यान एका वृत्तवाहिनीच्या पत्रकाराने एकनाथ शिंदेंना राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे एकत्र येण्याच्या चर्चांवर प्रश्न विचारला. यावर 'अरे जाऊदे यार.... काय तू कामाचं बोल यार...', अशा शब्दांत एकनाथ शिंदे यांनी यावेळी संताप व्यक्त केला. एकनाथ शिंदे यांच्या या प्रतिक्रियेचा व्हिडीओ सोशल मीडियावर चांगलाच व्हायरल होत आहे.

## पालकमंत्री अतुल सावे आज नांदेडमध्ये



**नांदेड (प्रतिनिधी)–** राज्याचे इतर मागास बहुजन कल्याण, दुग्धविकास व अपारंपारिक ऊर्जा मंत्री तथा नांदेड जिल्ह्याचे पालकमंत्री अतुल सावे हे सोमवार २१ एप्रिल २०२५ रोजी नांदेड दौऱ्यावर येत असून त्यांचा दौरा कार्यक्रम पुढीलप्रमाणे राहील.

सोमवार, दि. २१ एप्रिल २०२५ रोजी सकाळी ६ वा. छत्रपती संभाजीनगर येथून वाहनाने नांदेडकडे प्रयाण. सकाळी १० वा. शासकीय विश्रामगृह, नांदेड येथे आगमन व राखीव. दुपारी ३.४५ वा. शासकीय विश्राम गृह नांदेड येथून श्री. गुरू गोविंदसिंघजी विमानतळ नांदेडकडे वाहनाने प्रयाण. सायं. ४.१० वा. श्री गुरु गोविंदसिंघजी विमानतळ नांदेड येथे आगमन व राखीव. सायं. ५.१० वा. श्री. गुरु गोविंदसिंघजी विमानतळ नांदेड येथून विमानाने पुणेकडे प्रयाण करतील.

## डोनाल्ड ट्रम्प यांच्या धोरणांविरुद्ध १५ दिवसांत दुसऱ्यांदा अमेरिकेत अभूतपूर्व एल्गार; सर्व ५० राज्यात आंदोलन

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)–** अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या धोरणांविरुद्ध पुन्हा एकदा हजारो निदर्शक रस्त्यावर उतरले. हे निदर्शने सर्व ५० राज्यांमध्ये झाली. ट्रम्प यांच्या टॅरिफ वॉर धोरणांविरुद्ध आणि सरकारी नोकऱ्यांमधील कपातीविरुद्ध अमेरिकन नागरिक निदर्शने करत आहेत. यावेळी, निदर्शकांनी राष्ट्रपतींचे निवासस्थान असलेल्या व्हाईट हाऊसला वेढा घातला. लोकांनी ट्रम्प यांच्यावर सभ्यता आणि कायद्याचे राज्य चिरडल्याचा आरोप केला. या चळवळीला ५०५०१ असे नाव देण्यात आले आहे, ज्याचा अर्थ '५० निषेध, ५० राज्ये, १ चळवळ' असा होतो.

व्हाईट हाऊस व्यतिरिक्त, निदर्शकांनी टेस्ला शोरूमलाही घेराव घातला. ट्रम्प यांच्या विरोधात निदर्शनांचा हा दुसरा टप्पा आहे. यापूर्वी ५ एप्रिल रोजी देशभरात ट्रम्प यांच्या विरोधात निदर्शने झाली होती.

राजधानी वॉशिंग्टन डीसीसह सर्व राज्यांमध्ये होणाऱ्या निदर्शनांचे प्रमुख कारण म्हणजे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प आणि उद्योगपती मस्क यांची आक्रमक धोरणे. मस्क यांचा कार्यक्षमता विभाग सरकारी विभागांमध्ये सतत कपात करत आहे. आतापर्यंत हजारो सरकारी कर्मचाऱ्यांना त्यांच्या नोकरीवरून काढून टाकण्यात आलं आहे. दुसरीकडे, स्थलांतरितांविरुद्ध कारवाई करण्याचे आणि इतर देशांवर शुल्क लादण्याचे डोनाल्ड ट्रम्प यांचे कठोर धोरण हे देखील या निदर्शनांचे एक प्रमुख कारण आहे.

## कोहलीसमोर अय्यरच्या संघाने टेकले हात

**मुल्लानपूर (प्रतिनिधी)–** आयपीएल २०२५ चा ३७ वा सामना पंजाब किंग्ज आणि रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू या संघांमध्ये खेळला गेला. दोन्ही संघांमधील ही लढत मुल्लानपूर येथील महाराजा यादविंद्र सिंह आंतरराष्ट्रीय क्रिकेट स्टेडियमवर झाली, जिथे आरसीबी संघाने सहज विजय मिळवला. यासह, आरसीबीने पंजाब संघाकडूनही बदला घेतला. खरंतर, या हंगामात या दोन्ही संघांमधील ही दुसरी लढत होती. याआधी १८ एप्रिल रोजी पंजाबने आरसीबीला त्यांच्याच घरच्या मैदानावर ९५ धावांवर गुंडाळले होते आणि ५ विकेट्सने विजय मिळवला होता. पण या सामन्यात आरसीबीकडून दमदार कामगिरी दिसून आली.

रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूचा कर्णधार रजत पाटीदारने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला, जो योग्य ठरला. पंजाबच्या फलंदाजांना कमी धावसंख्येपर्यंत रोखण्यात आरसीबीच्या गोलंदाजांना यश आले. पंजाब संघाने २० षटकांत ६ गडी गमावून फक्त १५७ धावा केल्या. पंजाबकडून प्रभसिमरन सिंगने सर्वाधिक ३३ धावा केल्या. त्याच वेळी, शशांक सिंगने ३१ धावांची नाबाद खेळी करत संघाला या धावसंख्येपर्यंत पोहोचवले. जोश इंगलिसनेही २९ धावा केल्या आणि मार्को जॅन्सन २५ धावांवर नाबाद राहिला.

दुसरीकडे, कृणाल पांड्या आरसीबीचा सर्वात यशस्वी गोलंदाज ठरला. त्याने त्याच्या ४ षटकांच्या स्पेलमध्ये फक्त २५ धावा खर्च केल्या आणि २ फलंदाजांची शिकार केली. सुयश शर्मानेही ४ षटकांत २६ धावा देत २ विकेट घेतले. या व्यतिरिक्त, रोमारियो शेफर्डने १ यश मिळवले. भुवनेश्वर कुमारनेही किफायतशीर गोलंदाजी केली, जरी त्याला एकही विकेट घेता आली नाही.

## शहरातील ऑटो चालकांना पोलिसांच्या सक्त सूचना; वाहतूक नियमांची अंमलबजावणी करा, अन्यथा कडक कारवाई

**नांदेड (प्रतिनिधी)–** वाहतुकीच्या नियमांची अंमलबजावणी होण्यासाठी ऑटो संघटनेचे पदाधिकारी व ऑटो चालक यांना पोलीस प्रशासनाद्वारे निर्देश व सुजाण नागरिकांना महत्वाच्या सुचना एका बैठकीत देण्यात आल्या. वाहतूक नियमांची पायमल्ली होणार नाही, याची काळजी घ्यावी अन्यथा कारवाईस सामोरे जावे लागेल, असा इशारा पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी दिला.

नांदेड शहरात वाढत असलेल्या वाहतूक समस्या दूर करण्यासाठी नांदेड शहरातील ऑटोरिक्षा संघटनेचे पदाधिकारी व ऑटो चालक यांच्यासोबत चर्चा करण्यासाठी बैठक व कॉर्नर मिटींग घेण्याबाबत पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी आदेशित केले होते.

त्या अनुषंगाने सपोनि राजकुमार हिंगोले, शहर वाहतूक शाखा, इतवारा यांनी रविवारी सकाळी १० वाजता नांदेड शहरातील ऑटोरिक्षा संघटनेचे पदाधिकारी व ऑटो चालक यांच्यासोबत शहर वाहतूक शाखा, इतवारा कार्यालयात बैठक घेण्यात आली.





सदर बैठकीदरम्यान शहरातील ऑटोरिक्षा संघटनेचे पदाधिकारी व ऑटो चालक यांना वेगवेगळ्या प्रकारचे बॅनर, सुचना फलक याद्वारे मार्गदर्शन करण्यात आले व शहरात वाहन चालवित असताना वाहतुकीच्या नियमांचे पालन करण्याबाबत सुचना देण्यात आल्या आहेत.

ऑटो चालकांनी ऑटो चालवित असताना पांढरा गणवेश परिधान करणे आवश्यक आहे, ऑटो इतरत्र कोठेही न थांबविता ऑटो स्टँडवर थांबवावे, फ्रंट सिटवर प्रवाशी बसवून वाहतूक करू नये, ऑटो चालवित असताना कागदपत्रे सोबत बाळगावीत अशा सुचना यावेळी देण्यात आल्या.

सदर बैठकीसाठी प्रदेशाध्यक्ष टायगर ऑटो संघटनेचे अहमद बाबा बागवाले, उपाध्यक्ष मोहम्मद तय्यब, जिल्हाध्यक्ष शेख अहमद यांच्यासह आदी ऑटोरिक्षा संघटनेचे पदाधिकारी, इतर पदाधिकारी व ऑटो चालक हे उपस्थीत होते. तसेच रविवारी चंदासिंग कॉर्नर, ढवळे कॉर्नर, जुना मोंढा व देगलूर नाका या ठिकाणी वरील सुचनांच्या अनुषंगाने कॉर्नर मिटींग घेऊन वाहतुकीचे नियमांबाबत सुचना देण्यात आल्या आहेत.

दिलेल्या सुचनांप्रमाणे वाहतुकीच्या नियमांच्या जनजागृती सोबतच अंमलबजावणीसाठी दररोज विविध ठिकाणी मोहीम राबवून कार्यवाही तसेच ठिकठिकाणी रस्त्यावरील अवैध असलेले अतिक्रमण काढण्याबाबत मोहीम राबविण्यात येत आहे. पुढील टप्प्यात जुना मोंढा टॉवर परिसर, देगलूर नाका आणि बर्की चौक येथील वाहतुकीस अडथळा निर्माण करणाऱ्या अतिक्रमणाबाबत नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका यांच्यासोबत समन्वय साधून सदर अतिक्रमण हटवून कारवाई करण्यात येणार आहे, त्याबाबत यापुर्वीच पाठपुरावा करण्यात आला आहे. त्याचबरोबर आठवडा बाजाराचे स्थलांतर बाबत पत्रव्यवहार करण्यात आला असून वरिष्ठांशी चर्चा करण्यात आली आहे. आठवडी बाजारासाठी पर्यायी मैदानाची पाहणी करण्यात आली असून त्यावर काम सुरू आहे, असे यावेळी सांगण्यात आले.

तसेच नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकामार्फत चार मुख्य चौकात फ्रि लेफ्टअंतर्गत काम चालू झालेले आहे. सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्यासोबत समन्वय साधून ट्रॉफिक सिग्नल वर झेब्रा क्रॉसींग चिन्ह, स्टॉप लाईन रेषा इत्यादी बाबत चर्चा झाली असून त्याबाबत लवकरच काम सुरू होणार आहे.

तसेच टोईंग वाहनाबाबत नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका यांच्याशी पत्रव्यवहार करून चर्चा करण्यात आली आहे. काही दिवसांमध्ये त्यावर सुध्दा निर्णय होणे अपेक्षित आहे. शहरातील काही सुजाण नागरीक व शासनामधील अनुभवी लोकांचा एक वाहतुकीच्या संबंधाने समन्वय साधण्याकरीता ग्रुप तयार करण्यात येणार असून सदर ग्रुपमधील सदस्य हे वाहतुकीच्या संबंधाने जनजागृती करतील, असेही यावेळी सांगण्यात आले.

जे जे आपणासी ठावे, ते ते इतरांसी सांगावे
शहाणे करूनी सोडावे, सकळ जन

संस्थापक संपादकः
कै. देविदासराव रसाळ

गोदातीर समाचार

संपादक
केशव घोणसे पाटील

# भरकटलेले तरुण : आत्मपरीक्षणाची वेळ

राज्यातील विधानमंडळ अधिवेशन नुकतेच संपले. अनेक प्रश्न उपस्थित झाले, अनेक मुद्द्यांवर चर्चा झाली, पण सर्वसामान्य जनतेच्या पदरी काय पडले, हा प्रश्न वेगळाच आहे. मात्र, या अधिवेशनात पुण्यात सुरू असलेल्या 'कोयता गँग'च्या घटनांकडे लक्ष वेधले गेले आणि त्यावर गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिलेला खुलासा धक्कादायक ठरला. गृहमंत्र्यांनी विधानसभेत स्पष्ट केले की, पुणे शहरात 'कोयता गँग' नावाची कोणतीही संघटित गुन्हेगारी टोळी अस्तित्त्वात नाही. मात्र काही अल्पवयीन मुले, स्वतःला 'एरियाचा भाई' सिद्ध करण्याच्या नादात, कोयत्याचा वापर करून दहशत माजवत आहेत. पोलिसांच्या माहितीनुसार, अशा नऊ घटना घडल्या असून, त्यामध्ये १९ जणांना अटक करण्यात आली आहे. यातील १३ जण विधिसंघर्षग्रस्त बालकं म्हणजेच अल्पवयीन गुन्हेगार आहेत. पुण्यासारख्या सुसंस्कृत आणि शिक्षणप्रधान शहरात अशी परिस्थिती उद्भवते आहे, हे चिंतेचे आहे. तरुणाई चुकीच्या मार्गावर कशी वळते आहे याचे हे विदारक उदाहरण आहे. मात्र ही समस्या फक्त पुण्यापुरतीच मर्यादित नाही. राज्यातल्या अनेक भागांमध्ये आणि छोट्या वस्त्यांमध्ये देखील अशा प्रकारचे दादा आणि भाई दररोज जन्माला येत आहेत. यावरून तरुणाई किती वेगाने गुन्हेगारीच्या दलदलीत अडकते आहे हे स्पष्ट होते. प्रश्न आहे, या सगळ्याला जबाबदार कोण? सोशल मीडियाच्या आहारी गेलेली तरुण पिढी? की स्वतःचे भान हरवलेले पालक? की केवळ निवडणुकांपुरती आपली जबाबदारी मर्यादित समजणारे राजकारणी? पालकांचे लक्ष आपल्या मुलांच्या वागणुकीकडे, संगतीकडे आणि सोशल मीडियावरील हालचालीकडे असणे अत्यंत आवश्यक आहे. प्रत्येक बिचकलेले पाऊल पुढे गंभीर स्वरूप धारण करू शकते. यासोबतच समाज म्हणून आपली भूमिका महत्त्वाची ठरते. केवळ पोलिसांनी अटक केली की प्रश्न सुटतो, असे मानणे अज्ञानीपणाचे ठरेल. समाज, शिक्षक, स्थानिक संस्था, आणि माध्यमांनीही एकत्र येऊन या समस्येवर काम करण्याची गरज आहे. दुसरीकडे, राजकीय नेत्यांनीही निवडणुकीपुरतेच नव्हे, तर दीर्घकालीन धोरणांच्या माध्यमातून तरुणाईला योग्य मार्गावर ठेवण्यासाठी पावले उचलली पाहिजेत. ते आपल्या पुढच्या पिढ्यांना कशा प्रकारे सुरक्षित ठेवतात हे त्यांच्या प्रतिज्ञापत्रांवरून लक्षात येते. मग सामान्य जनतेनेही हेच विचारायचे की, त्यांच्याही मुलांना सुरक्षित जीवन देण्याची जबाबदारी समाज आणि शासनाच्या एकत्रित प्रयत्नांतूनच पूर्ण होणार आहे. भाईगिरीचे हे विकृत आकर्षण, इंस्टाग्राम रील्सवरील दिखाऊ जग, आणि खोट्या प्रतिष्ठेची धाव या सर्वातून बाहेर पडणे हे महत्त्वाचे आव्हान आहे. समाजाने आता गंभीर आत्मचिंतन करायला हवे. केवळ चर्चा करून किंवा शाळांमध्ये एक-दोन कार्यक्रम घेऊन बदल होणार नाही. मुलांना ऐकून घेणारे, त्यांच्यावर विश्वास ठेवणारे, पण वेळ पडल्यास योग्य मार्गदर्शन करणारे पालक, शिक्षक आणि समाज आवश्यक आहे. आपले तरुण व्यसन आणि गुन्हेगारी यांच्या आहारी का जात आहेत. याच्या अनेक कारणांपैकी सगळ्यात महत्त्वाचे कारण म्हणजे बेरोजगारी. तरुण शिकलेला असो किंवा अशिक्षित त्याच्या हाताला कोणतेही काम नाही. हे एकीकडे चित्र दिसते आणि दुसरीकडे मात्र अनेक ठिकाणी खूप काम उपलब्ध असतानासुद्धा तरुण ते काम करत नाहीत. याचे महत्त्वाचे कारण म्हणजे बहुतांश तरुणांना मुळीच मेहनत न करता पैसे मिळावेत असे वाटते किंवा कमीत कमी कामांमध्ये जास्तीत जास्त मोबदला मिळावा ही मानसिकता किंवा विकृती निर्माण झाली आहे. कारण त्यांच्या डोळ्यापुढे काही काम न करता करोडपती होणारे राजकीय नेते उपलब्ध आहेत. त्यांच्याकडे बघूनच हे तरुण आपल्या जीवनाचं स्वप्न रंगवत असतात. अशा या गंभीर होत चाललेल्या समस्येकडे पाहून समाजाने जर वेळेत डोळे उघडले नाहीत, तर ही समस्यांची शृंखला आणखी गंभीर होईल. आज जर तरुणांच्या हातात कोयत्याऐवजी पुस्तके, साधने, आणि सर्जनशीलता दिली गेली, तरच उद्याचे सुरक्षित आणि सुदृढ समाजाचे स्वप्न साकार होईल.

# पृथ्वीला महाविनाशापासून वाचविण्यासाठी संकल्पाची गरज



पृथ्वीचा दिवसेंदिवस ऱ्हास होत आहे. यामुळे ऑक्सिजनची मात्रा कमी होत आहे ही घटना कोरोना महामारीच्या रूपाने आपण उघडल्या डोळ्यांनी पाहिली. यामुळे जगात लाखोंच्या संख्येने जीवित हानी सुध्दा झाली. याकरिता पृथ्वीला वाचविण्यासाठी सर्वांनी संकल्प करण्याची गरज आहे.

जगात पृथ्वी सुरक्षित रहावी या उद्देशाने १९७० पासून जागतिक पृथ्वी दिवस साजरा करण्यात येतो. प्लास्टीक पासुन होणारे प्रदूषण व पृथ्वीला निर्माण होणारा धोका यावर मोठ्या प्रमाणात कार्यक्रम राबविण्यात आले व अनेक देशांनी प्लास्टीकपासून होणारे प्रदूषण टाळण्याचा प्रयत्न केला व अनेक देश प्लास्टीकच्या प्रदूषणापासून मुक्त झाले. भारतानेही पृथ्वी संरक्षणासाठी व प्रदूषण दूर करण्यासाठी प्लास्टीकवर बंदी घातली आहे. सध्याच्या परिस्थितीत जगातील वाढती लोकसंख्या पृथ्वीतलावरील मोठे संकट आहे. यामुळे हवेतील ऑक्सिजनची मात्रा दिवसेंदिवस कमी होताना दिसून येते. कारण जगातील वाढत्या लोकसंख्येमुळे जंगलसंपदा छिन्न-विछीन्न झाल्याचे दिसून येते. त्याचप्रमाणे अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या युगात मोठ्या प्रमाणात कारखाने दिसून येतात. यामुळे संपूर्ण जगात स्थल-प्रदूषण, वायुप्रदूषण व जलप्रदूषण मोठ्या प्रमाणात होताना दिसते. कारखान्यांचा विस्तार जगातील सर्वच देशांनी वाढविला आहे. यामुळे पहिला प्रहार जंगलसंपत्तीवर केलेला आहे. मानवाच्या अतिरेकामुळे पृथ्वीतलावर भुकंप, ज्वालामुखीचा उद्रेक, त्सुनामी, महाप्रलय, महामारी, साथीचे रोग, अती पाऊस, अती उष्णता, अती थंडी अशाप्रकारचे विनाशाकडे नेणाऱ्या घटना दिवसेंदिवस वाढताना दिसत आहेत. ह्या संपूर्ण घटना मानवाने पृथ्वीवर अत्याचार केल्यामुळे दिसून येतात. २१ व्या शतकात मानव इतका सामोरं गेला आहे की, अनेक टेक्नॉलॉजीच्या माध्यमातून अत्याधुनिक हतियार, अनुबॉम्ब बनविण्याच्या शर्यती लागलेल्या आहेत. आता तर बायोवेपन्स म्हणजे जैविक हतीयार बनविण्याची शर्यत लागली आहे. यामुळे पृथ्वीचा ऱ्हास होवू शकतो.

आज संपूर्ण जग उत्पादन वाढविण्यासाठी जैविक खतांचा वापर करीत आहे. यामुळे पृथ्वीतील शक्ती व ऑक्सिजन दिवसेंदिवस कमी होताना दिसते. सध्याच्या परिस्थितीत चिन जैविक हत्यार बनविणारा देश बनलेला आहे. चिन असा देश बनला आहे की, नेहमीच तो जैविक हत्याराचे वेग-वेगळे परीक्षण करीत असतो. २०१९ मध्ये चिनने कोरोना व्हायरसचे परीक्षण करून मानवजातीसोबत खुनी तांडव केल्याचे दिसून आले. आज संपूर्ण जग पृथ्वीला वाचविण्यासाठी प्रयत्न करीत आहे तर चिन पृथ्वीचा सर्वनाश करताना दिसतो. आज मानवाने जंगल संपत्तीची हत्या केल्यामुळे नदी-नाले, तलाव, विहिरी मोठ्या प्रमाणात आटलेले दिसतात. यामुळे दिवसेंदिवस पृथ्वीच्या तापमानात व हवामानात मोठ्या प्रमाणात बदल झाल्याचे दिसून येते. त्याचप्रमाणे ग्लोबल वॉर्मिगमुळे सुध्दा पृथ्वीचे संतुलन डगमगायला लागले आहे. पृथ्वीवरील जंगलसंपदा कमी झाल्यामुळे व छोटे-मोठे तलाव आटल्यामुळे हिंसक पशु व जंगलातील इतर पशू (वाघ, बिबट्या, अस्वल, हरीण, बंदर) यांना जंगलात योग्य आहार व पाणी मिळत नसल्यामुळे शहराकडे धाव घेतांना दिसतात. हा अत्यंत चिंतेचा आणि गंभीर विषय आहे. अशा अनेक कारणांमुळे पृथ्वीचा ऱ्हास होत आहे व जंगली प्राण्यांचे जीवन धोक्यात आलेले आहे. यावर उपाय शोधण्यासाठी जागतिक स्तरावर अनेक योजना राबविल्या जातात. त्यातूनच १९७० मध्ये विंसकॉन्सिन सीनेटर गेलॉर्ड नेल्सन यांनी २२ एप्रिल हा जागतिक पृथ्वी दिवस साजरा करण्याची संकल्पना साकार केली आणि तेव्हापासून २२ एप्रिल हा जागतिक पृथ्वी दिवस म्हणून साजरा केला जातो. आज जगात २०० हुन अधिक देश आहेत. या देशांच्या तुलनेत लोकसंख्येचा विचार केला तर १००० कोटींच्या वर लोकसंख्या आहे. त्यामुळे संपूर्ण देशांनी पृथ्वीला वाचविण्याच्या उद्देशाने २२ एप्रिलला प्रत्येक व्यक्तीने एकतरी झाड लावायला पाहिजे. कारण आपण उघड्या डोळ्यांनी कोरोना महामारीच्या काळात ऑक्सिजनचा तुटवडा पाहिला आहे. परंतु नैसर्गिक ऑक्सिजन टिकवून ठेवण्यासाठी जंगल वाचविले पाहिजे. वृक्षारोपण केले पाहिजे. ज्यांच्या परिसरात जागा नसेल अशांनी एखाद्या कुंडीमध्ये झाड लावून पृथ्वी दिवस साजरा करायला पाहिजे.त्याचप्रमाणे जंगल तोडीमुळे जंगलातील प्राणी शहराकडे भटकतात त्यांच्यासाठी जगातील संपूर्ण देशांनी जंगलामध्ये छोटे-छोटे तलाव बांधून जंगली प्राण्यांचे प्राण वाचवून संगोपन करायला हवे. कारण मानवाच्या अनेक चुकांमुळे अनेक जंगली पशु-पक्षी व महत्त्वपूर्ण औषधीयुक्त वृक्ष लुप्त होत आहे. या पृथ्वीतलावर प्रत्येक प्राण्याचे व वृक्षांचे असणे आवश्यक आहे. कारण प्रत्येक पशु-पक्षी एकमेकांवर अवलंबून असतो. त्याचप्रमाणे प्रत्येक वृक्ष महत्त्वाची भूमिका बजावीत असते.

जगातील गिधाड हा पक्षी अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावीत असतो. मेलेल्या प्राण्यांचे मांस खाणे गिधाडचे काम असते. त्यामुळे अशुद्ध परिसर शुद्ध होतो. परंतु दुःखाची बाब ही की वायुप्रदूषण व जलप्रदूषण यामुळे गिधाडांची संख्या नाहीच्या बरोबरीत दिसते. त्यामुळे पृथ्वीवर मानवजातीचे असणे जेवढे महत्त्वाचे आहे तेवढेच जंगलातील संपूर्ण पशु-पक्षी यांचे सुध्दा जीवन तेवढेच महत्त्वाचे आहे. तेव्हाच पृथ्वी सुरक्षित राहील.

मानवजातीने स्वतःच्या स्वार्थापोटी पृथ्वीची राखरांगोळी केली आहे. पुढे चालून महाभयानक परिणाम सर्वांनाच भोगावे लागतील आणि आज आपण गेल्या दोन वर्षांत कोरोना महामारीच्या रूपात भोगले सुध्दा आहे आणि आता रशिया -युक्रेन युध्दामुळे तिसऱ्या महायुद्धाचे संकट पृथ्वीवर ओढवल्याचे दिसून येते. आज मानव-जातीने पूर्वेपासून तर पश्चिमपर्यंत उत्तरपासून तर दक्षिणपर्यंत, आकाश-पाताळा या संपूर्ण ठिकाणी मोठ्या प्रमाणात प्रदुषणाचे जाळे पसरविले आहे. यामुळे आज पृथ्वी माता सुध्दा भयभीत आणि चिंतेत आहे. म्हणूनच आज आपल्याला कृत्रिम ऑक्सिजनची गरज भासत आहे.

आज मानवाची रक्षा करण्याकरिता पृथ्वीला वाचविण्याचा संकल्प जगातील संपूर्ण राष्ट्रांनी करायला पाहिजे. आज वृक्षलागवडच पृथ्वीला वाचवू शकते. कारण आज जगात जंगलांचे संगोपन होत नसल्याने मोठ्या प्रमाणात वनवे लागताना दिसतात व यामुळे मोठ्या प्रमाणात जंगल संपदा नष्ट होत आहे. त्याचप्रमाणे देशात व जगात दिवसेंदिवस आगीच्या सुध्दा घटना मोठ्या प्रमाणात वाढत आहेत. याचे मुख्य कारण म्हणजे वाढते तापमान यामुळे पृथ्वीचे संतुलन डगमगत आहे हे नक्की. याला कुठेतरी थांबवायला पाहिजे. वृक्ष लागवडीमुळे पावसाचे पाणी जमिनीमध्ये मुरेल व पावसाचे पाणी सरळ समुद्र किंवा नद्यामध्ये न जाता पृथ्वीच्या पोटात जाईल. यामुळे जमिनीतील पाण्याची पातळी वाढण्यास मोठी मदत मिळेल व उष्णतेचे प्रमाण कमी होईल. यामुळे विहिरी, तलाव व नदी-नाले नेहमी जलमग्न राहील. आज मानवाने पाण्यासाठी सरळ पाताळात प्रवेश केला आहे. म्हणजेच आज मानवाने पाण्यासाठी जमिनीच्या आत ७०० फुट खोलवर जाऊन बोरवेलच्या सहाय्याने आपण देवलोकातील (पाताळातील) पाणी शोषीत आहोत.

मानवाची जमिनीतील पाण्याची क्षमता फक्त ५० ते ६० फुटांपर्यंत आहे.परंतु मानवाचा अतिरेक हा विध्वंसाकडे किंवा विनाशाकडे न्यायला काहीच वेळ लागणार नाही. कारण मानवाच्या हातात सर्वच काही आहे.परंतु मानवाला अजूनपर्यंत निसर्गावर नियंत्रण ठेवता आले नाही. नैसर्गिक आपदासमोर मानव नेहमी हतबल होतांना दिसतो. वनवा लागणे, महाप्रलय येणे, हिमकडा कोसळणे, उष्णतामान वाढणे, भूकंप येणे, त्सुनामी येणे ह्या संपूर्ण गोष्टी मानवाने स्वतःहुन ओढवलेल्या आहेत. यामुळे जगात दरवर्षी मोठ्या प्रमाणात जीवित हानी व वित्तीय हानी होतांना आपण पहातो. यामुळे आज संपूर्ण जगाने एकत्र येऊन पृथ्वीला वाचविण्याचा संकल्प केला पाहिजे. पृथ्वीला वाचविणे म्हणजे महायुध्द जिंकण्यासारखेच आहे. हे महायुध्द जिंकण्यासाठी जगातून सर्वच स्तरातून प्रयत्न व्हावयास पाहिजे. आज संपूर्ण जग कठीण घडीतून प्रवेश करीत आहे. संपूर्ण मानवजातीपुढे तीन प्रश्न उभे ठाकले आहेत एक आहे पृथ्वीचे रक्षण, दुसरे म्हणजे वैश्विक महामारीपासून सुटका आणि तिसरे म्हणजे तिसऱ्या महायुद्धापासून जगाला वाचविणे याबाबी तेव्हाच शक्य होवू शकते जेव्हा मानवजात खरी माणुसकी दाखवेल. कारण दिवसेंदिवस समुद्राच्या पाण्याची पातळी वाढून पृथ्वीवरील जमिनीचा भूभाग कमी होताना दिसतो. याकरीता ग्रामीण भागातून शहराकडे येणारा लोंढा थांबविला पाहिजे व सरकारने शेतीला सर्वतोपरी प्रथम प्राधान्य द्यायला पाहिजे. यामुळे पृथ्वीचे रक्षण होईल व खऱ्याअर्थाने पृथ्वी दिवस मानल्या जाईल.

पृथ्वी मानवजाती के लिये मेहमान है, मालक नहीं ही बाब मानवजातीने लक्षात ठेवली पाहिजे व पृथ्वीचे रक्षण केले पाहिजे. सध्याच्या परिस्थितीत पृथ्वीवर तिसऱ्या महायुद्धाचे संकट ओढवतांना दिसत आहे. कारण युक्रेन युद्ध पहाता अमेरिका, रशिया, चीन, उत्तर कोरिया, जापान, इराण, इराक, इजरायल, ब्रिटन एकमेकांच्या विरोधात अनुबॉम्बच्या किंवा अत्याधुनिक मिसाईलच्या धमक्या देतांना दिसतात. यामुळे पृथ्वीचा विनाश केव्हाही होवू शकतो याला ताबडतोब थांबायला हवे. पृथ्वी दिनाच्या निमित्ताने मी सर्वांना आग्रह व विनंती करतो की, नैसर्गिक ऑक्सिजन वाढविण्यासाठी जंगलतोड थांबवायला हवी व मोठ्या प्रमाणात वृक्षलागवडीवर भर द्यायला हवा. यामुळे गुरांना चारा व सर्वांना शुद्ध हवा आणि शुद्ध ऑक्सिजन मिळण्यास मोठी मदत मिळेल व पृथ्वी वाचेल. पृथ्वी सुरक्षित तर संपूर्ण जीवसृष्टी सुरक्षित हा मूलमंत्र जगातील संपूर्ण देशांनी जपायला हवा.

**-रमेश लांजेवार**
नागपूर
मो. ९९२१६९०७७९

# मराठी शाळाच दर्जेदार

मार्च, एप्रिल महिन्यांमध्ये परीक्षा संपल्या की, विद्यार्थी निर्धास्त होतात कारण पुढील दीड दोन महिने त्यांच्यासाठी सुट्टीचे असतात. पण याच दोन महिन्यात पालकांना वेध लागतात ते आपल्या पाल्यांच्या पुढील शिक्षणाच्या प्रवेशाचे. दाखलपात्र विद्यार्थ्यांचे पालक म्हणजे ज्यांचे पाल्य पहिलीत दाखल होणार आहेत अशा पालकांमध्ये तर मोठा संभ्रम असतो. आपल्या पाल्यांना मराठी शाळेत दाखल करायचे की इंग्रजी शाळेत दाखल करायचे याबाबत त्या पालकांमध्ये मोठा संभ्रम असतो. मुलांचे शिकण्याचे माध्यम मराठी असावे की इंग्रजी यावर मग कुटुंबात मोठा खल होतो. नातेवाईक, शेजार पाजारी, मित्रमंडळी अशा पालकांना वेगवेगळा सल्ला देत असतात अशा वेळी कोणता निर्णय घ्यावा असा मोठा पेच या पालकांना पडतो. इंग्रजी भाषा ज्ञान भाषा असल्याने इंग्रजी माध्यमात शिक्षण घेण्याकडे बहुतेकांचा कल असतो आणि खरी फसगत इथेच होते.

इंग्रजी येण्यासाठी इंग्रजी माध्यमातूनच शिक्षण घ्यावे असे काही नाही मराठी माध्यमातून शिक्षण घेऊनही मुल चांगल्या प्रकारे इंग्रजी शिकू शिकू शकते. आज जे उच्चपदावर बसलेले नामवंत व्यक्ती आहेत ते सर्व मराठी माध्यमातूनच आणि सरकारी शाळेतूनच शिकले आहेत. खरे तर आज जिल्हा परिषद आणि महानगर पालिकेच्या सरकारी शाळेतून दर्जेदार शिक्षण दिले जाते. आज मराठी माध्यमांच्या शाळा देखील कात टाकत आहेत. मराठी माध्यमांच्या सरकारी शाळेत गुणवान, प्रयोगशील, तंत्रस्नेही शिक्षक आहेत. सर्व शिक्षक डी एड, बी एड, एम एड असे उच्च गुणवत्ता प्राप्त आहेत. हे शिक्षक वेगवेगळ्या अध्यापन पद्धतींचा वापर करून विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण देतात.



मराठी माध्यमांच्या शाळेत ई लर्निंग, क्टिव्हिटी बेस लार्निंग च्या माध्यमातून शिक्षण दिले जाते. राज्यातील हजारो शाळा आय एस ओ नामांकन प्राप्त झाल्या आहेत. डिजिटल स्कूल, टॅब स्कूल या संकल्पना या शाळेतही रुजत आहेत. जिल्हा परिषद आणि महानगर पालिकेच्या शाळेतही आता सेमी इंग्रजी वर्ग सुरू करण्यात आले आहेत. गुणवत्तेच्या बाबतीतही या मराठी शाळा कोठे कमी नाहीत. ५ वी आणि ८ वी च्या शिष्यवृत्ती परीक्षेच्या गुणवत्ता यादीत सर्वाधिक विद्यार्थी हे जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थीच असतात. नुकताच जवाहर नवोदय परीक्षेचा निकाल घोषित झाला. यात जिल्हा परिषद शाळेतीलच सर्वाधिक विद्यार्थी गुणवत्ता यादीत आले आहेत. याशिवाय मंथन, प्रज्ञाशोध या स्पर्धा परीक्षेतही मराठी शाळांचाच डंका वाजतो.

जिल्हा परिषद आणि महानगर पालिकेच्या सरकारी शाळेत मोफत शिक्षण दिले जाते. मोफत पाठ्यपुस्तके, मोफत गणवेश, मोफत शैक्षणिक साहित्य, शालेय पोषण आहार, विविध शिष्यवृत्त्या मिळतात. गुणवत्तेसह सह शालेय उपक्रमातही मराठी शाळा आघाडीवर असतात. मराठी शाळेत पहिलीत दाखल होणाऱ्या विद्यार्थ्यांचा मेळावा, सहल, वनभोजन, क्षेत्रभेट, मातृ - पितृ पूजन, आनंदी बाजार, स्नेहसंमेलन, क्रीडास्पर्धा, ग्रंथदिंडी, वृक्षदिंडी, विविध स्पर्धा सर्व महापुरुषांच्या जयंत्या असे विविध उपक्रम राबवले जातात.

आता मराठी माध्यमांच्या सरकारी शाळांकडे पाहण्याचा दृष्टिकोनही बदलला आहे. ग्रामीण भागातील जिल्हा परिषदेच्या शाळेत इंग्रजी माध्यमांच्या शाळेतील विद्यार्थी दाखल होत आहेत. आता तर सर्वच मराठी शाळेत सीबीएएससी चा अभ्यासक्रम शिकवला जाणार आहे म्हणजे जे शिक्षण इंग्रजी माध्यमांच्या खाजगी शाळेत मिळते तेच शिक्षण आता मराठी माध्यमांच्या शाळेतही मिळणार आहे तरीही शहरातील पालकांना अजूनही इंग्रजी शाळेचा मोह सुटत नाही.

इंग्रजी माध्यमांच्या शाळांच्या झगमगाटाला भुलून पालक त्या शाळांच्या नादी लागत आहेत. या इंग्रजी माध्यमांच्या शाळांनी शिक्षणाचा बाजार केला आहे . अगदी के जी च्या प्रवेशासाठीही लाखोंची देणगी घेतली जाते शिवाय इमारत निधी, ट्रस्ट निधी तसेच वर्षभर चालणारे वेगवेगळे कार्यक्रम या माध्यमातून पैसे उकळले जातात. पालकांच्या खिशाला कात्री लावण्यासाठी या शाळा वेगवेगळे फंडे शोधत असतात. जर एखाद्या पालकांनी फी भरण्यास उशीर केला तर विद्यार्थ्यांचे शिक्षण बंद करण्यापर्यंत मजल या शाळांची जाते. कोरोना काळात फी भरता न आलेल्या विद्यार्थ्यांना ऑनलाईन शिक्षणापासून वंचित ठेवण्याचे पाप काही इंग्रजी शाळांनी केले आहे. अनेक इंग्रजी शाळा शैक्षणिक साहित्य शाळेतूनच खरेदी करण्याची सक्ती केली जाते. २००३ मध्ये उच्च न्यायलयाने दिलेल्या निकालात शैक्षणिक साहित्य शाळेकडूनच किंवा ठराविक विक्रेत्यांकडूनच खरेदी करण्याची सक्ती करता येणार नाही असे म्हंटले आहे. सरकारनेही वेळोवेळी तसे आदेश काढले आहेत पण या शाळांना सरकारी आदेशाचा आणि न्यायालयाच्या निकालाचा विसर पडला आहे न्यायालये व सरकारला न जुमानता आपली शैक्षणिक दुकानदारी चालवणाऱ्या या शाळांना चाप लावायचा असेल तर पालकांनी आपल्या पाल्यांना या शाळेत दाखल करण्याऐवजी मराठी माध्यमांच्या शाळेत दखल करावे

**-श्याम ठाणेदार**
दौंड, जि. पुणे
मो. ९९२२५४६२९५

# मानवी गणकयंत्र : शकुंतलादेवी!



जगभरात मानव संगणक (ह्युमन कॉम्प्युटर) म्हणून ओळखल्या जाणाऱ्या, बालपणापासूनच अद्‌भूत प्रतिभेचे वरदान लाभलेल्या गणितज्ञ, ज्योतिषी, लेखिका, बासरी वादन अशा अनेक कला अवगत असणाऱ्या विलक्षण व्यक्ती म्हणजेच शकुंतलादेवी यांचा २१ एप्रिल हा स्मृतिदिन. आपल्या प्रतिभेला ईश्वराची देणगी म्हणणाऱ्या शकुंतला देवी या गणिताला केवळ 'कॉन्सेप्ट' आणि 'लॉजिक' मानत असत. गणिताबद्दलची आपल्या ज्ञानाची चमक त्यांनी जगभरातील असंख्य कॉलेजस, विद्यापीठे, थिएटर, रेडिओ आणि टेलिव्हिजन कार्यक्रमातही दाखवली. १९७७ मध्ये अमेरिकेत तर शकुंतला यांनी कॉम्प्युटरच्या क्षमतेशी स्पर्धा करून दाखवताना १८८१३२५१७ या संख्येचे घनमूळ सांगितले होते तर १९८० साली लंडनमध्ये एम्पेरियल कॉलेजमध्ये ७,६८६,३६९,७७४,८७० आणि २,४६५,०९९,७४५,७७९ या दोन यादृच्छिकपणे (randomly) निवडल्या गेलेल्या १३ अंकी संख्येचा गुणाकार शकुंतला देवी यांनी अवघ्या २८ सेकंदात केला आणि तत्कालीन वेगवान कॉम्प्यूटरलाही मागे टाकले. गेल्या वर्षी त्यांच्या जीवनावर आधारित विद्या बालन मुख्य भूमिकेत असणारा शकुंतलादेवी-ह्युमन कॉम्प्युटर नावाचा चित्रपट आला आहे. १९८० व ९० च्या दशकात भारतातील खेड्यात व शहरांमध्ये एखाद्या मुलाने गणितामध्ये हुशारी दाखविली तर ते शकुंतला देवी होत असल्याचे म्हटले जात असे. त्यांच्या स्मृतिदिनानिमित्त त्यांना विनम्र अभिवादन !

शकुंतलादेवी यांचा जन्म ४ नोव्हेंबर १९२९ रोजी कर्नाटक राज्यातील बंगळूरू येथे एका परंपरावादी ब्राह्मण कुटुंबात झाला. त्यांचा जन्म एका गरीब कुटुंबात झाल्याने त्यांना औपचारिक शिक्षणही घेता आले नाही. त्यांच्या लहानपणी त्यांच्या वडिलांनी मंदिराचा पुजारी होण्यास नकार दिला होता. त्यांना मदारी सारखे खेळ दाखवत ताणलेल्या दोरीवरून चालून लोकांचे मनोरंजन करायला आवडत असे. परिणामी, त्यांनी सर्कसमध्ये कसरतीचे काम करण्यास सुरवात केली. शकुंतला देवी अवघ्या तीन वर्षाच्या असताना, पत्ते खेळताना त्यांनी आपल्या वडिलांचा अनेकदा पराभव केला. आपल्या मुलीच्या या क्षमतेबद्दल वडिलांना जेव्हा कळले तेव्हा त्यांनी सर्कस सोडून शकुंतला देवीवर सार्वजनिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यास सुरवात केली आणि स्थानिक पातळीवर प्रथम त्यांची क्षमता दाखविली. वडिलांच्या माध्यमातून रस्त्यावर आपली क्षमता दाखविणाऱ्या शकुंतलादेवी जेव्हा १५ वर्षाच्या झाल्या तेव्हा बीबीसी रेडिओवरील एका कार्यक्रमात त्यांना गणितातील एक किचकट प्रश्न विचारला गेला तेव्हा शकुंतला देवीनी लगेचच त्याचे उत्तर दिले. या घटनेची मजेदार बाजू अशी होती की, शकुंतला देवीने दिलेली उत्तरे बरोबर होती तर रेडिओ सादरकर्त्याचे उत्तर चुकीचे होते. येथूनच त्या राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर ओळखू लागल्या. शकुंतला देवी यांचा विवाह १९६० मध्ये कोलकाता येथील आय.ए.एस. अधिकारी परितोष बॅनर्जी यांच्याशी झाला होता. तथापि, त्यांचे वैवाहिक जीवन फार काळ टिकू शकले नाही आणि १९७९ मध्ये मध्ये त्या आपल्या पतीपासून विभक्त झाल्या आणि १९८० साली त्या आपल्या मुलीसमवेत पुन्हा बंगळुरुला परतल्या. येथे त्यांनी सेलिब्रिटींना आणि राजकारण्यांना ज्योतिषाचा सल्ला देण्यास सुरवात केली.

शकुंतला देवी यांनी जगातील ५० हून अधिक देशांमध्ये प्रवास केला आणि अनेक शैक्षणिक संस्था, चित्रपटगृहे आणि अगदी दूरचित्रवाणीवरही त्यांनी आपली गणिती क्षमता दाखविली. २७ सप्टेंबर १९७३ रोजी 'बीबीसी' या रेडिओ चॅनलद्वारे आयोजित 'नॅशनवाइड' या जगभर प्रसारित होणाऱ्या कार्यक्रमात तत्कालीन सुप्रसिद्ध बॉब वेलिंग्ज यांच्या गणिताशी संबंधित सर्व जटिल प्रश्नांची उत्तरे देऊन त्यांनी सर्वांना स्तिमित केले. त्यांच्या प्रतिभेने त्यांच्या चाहत्यांची संख्या भारतासह जगभरात निरंतर वाढत राहिली. एवढ्या लहान वयात गणिताच्या क्षेत्रात अशी अद्‌भूत क्षमता त्यावेळी जगात कुठेही आढळली नव्हती. १८ जून १९८० रोजी लंडनच्या इम्पीरियल कॉलेजमध्ये त्यांनी गणिताच्या कठीण प्रश्नाला काही सेकंदात अचूक उत्तर देऊन तेथे उपस्थित प्रेक्षकांना आश्चर्यचकित केले. तर वयाच्या अवघ्या १६ व्या वर्षी त्यांनी केवळ २८ सेकंदात दोन १३ अंकी संख्यांचा गुणाकार केला आणि १० सेकंदांच्या फरकाने जगातील सर्वात वेगवान संगणकाचा पराभव केला. त्यांची ही आश्चर्यकारक क्षमता पाहून प्रत्येकाला वेळोवेळी त्यांची चाचणी घ्यावी वाटायची. १९७७ साली शकुंतला देवी यांना अमेरिकेत जाण्याची संधी मिळाली. तेथे डॅलस येथील एका विद्यापीठात त्यांना आधुनिक तंत्रज्ञानाने युक्त 'युनिव्हॅक' या संगणकाशी सामना करावा लागला. या सामन्यात शकुंतलादेवींना एका २०१ अंकी संख्येचे ५४६,३७२,८९१ हे २३ वे मूळ मानसिक गणनेतून काढावे लागले. हा प्रश्न सोडविण्यासाठी त्यांना मात्र ५० सेकंद लागले, तर 'युनिव्हॅक' नावाच्या संगणकाला हे काम करण्यासाठी तब्बल ६२ सेकंद लागले. या घटनेनंतर शकुंतला देवींना 'भारतीय मानवी संगणक' म्हणून जगभरात प्रसिद्धी मिळाली.

तल्लख बुद्धिमत्ता, गणिते सोडवण्याचा अचाट वेग, उपजत असलेली विनोदबुद्धी यामुळे अंकगणिताच्या बाबतीत तर त्यांनी जगभरात मान्यता मिळवलीच; तसेच व्यक्ती म्हणूनही त्यांच्याकडे सहज आकर्षित व्हावे, अशी त्यांची छबी तयार झाली. कॅलिफोर्निया, बर्कले विद्यापीठातील आर्थर जेन्सन या मानसशास्त्राच्या प्रोफेसरांनी १९८८ मध्ये शकुंतलादेवीच्या या कौशल्यांचा अभ्यास करण्यासाठी त्यांना निमंत्रण दिले. विविध ज्ञानात्मक, आकलनात्मक पातळ्यांवरील प्रश्न त्यांना सोडवण्यासाठी देण्यात आले. ६१,६२९,८७५ या संख्येचे घनमूळ आणि १७०,८५९,३७५ या संख्येचे सातवे मूळ काढण्याचे प्रश्न त्यांना दिले गेले. तेव्हाची नोंद म्हणून प्रो.जेन्सन लिहितात की, 'मी प्रश्न वहीत उतरवून घ्यायचेही पूर्ण झाले नव्हते, त्याआधीच ३९५ आणि १५ ही दोन्ही उत्तरे शकुंतला देवींनी देऊन टाकली होती.

शकुंतला देवी यांना १९६९ मध्ये फिलिपिन्स विद्यापीठाने 'स्पेशल वूमन ऑफ द इयर' पदवी आणि सुवर्णपदक दिले तर १९८८ मध्ये वॉशिंग्टन डीसीमध्ये त्यांना 'रामानुजन मॅथेमॅटिकल जीनियस अवॉर्ड'ने सन्मानित करण्यात आले. त्यांची प्रतिभा पाहून १९८२ साली त्यांचा 'गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड्स' मध्येही समावेश झाला. त्यांच्या मृत्यूच्या एक महिना आधी २०१३ मध्ये त्यांना मुंबईत 'लाइफटाइम अचिव्हमेंट अवॉर्ड' देखील देण्यात आले होते. ४ नोव्हेंबर २०१३ रोजी वयाच्या ८३ व्या वाढदिवशी गुगलने त्यांचा सन्मान म्हणून त्यांना 'गुगल डूडल' समर्पित केले. २१ एप्रिल रोजी शकुंतला देवी यांचे वयाच्या ८४ व्या वर्षी बंगळूरू (कर्नाटक) येथे दीर्घ आजाराने आणि हृदयविकाराने निधन झाले. त्यांच्या स्मृतीस विनम्र अभिवादन!

**-प्रा. विजय कोष्टी,**
पी.व्ही.पी. कॉलेज कवठे महांकाळ,
जि.सांगली
मो. ९४२३८२९११७

## थोडक्यात...

### वात्सल्यनगर गृहनिर्माण संस्थेच्या चेअरमनपदी डॉ. कलंत्री

**नवीन नांदेड (प्रतिनिधी)** – सिडको येथील वात्सल्यनगर सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या अध्यक्षपदी डॉ. अशोक कलंत्री यांची तिसऱ्यांदा बिनविरोध फेरनिवड झाली



आहे. दि. २७ रोजी झालेल्या सभासदाच्या बैठकीत निवडणूक अधिकारी एस. के. सरकटे यांनी ही घोषणा केली. यात सर्वसाधारण गटातुन विश्वनाथ हंगरगेकर, दत्तात्रय गोडघासे, प्रदिप बिरादार, बळवंत तुप्पेकर, किरणकुमार धूत, डॉ.अशोक कलंत्री, आनंद कोटगिरे तर सौ. सिंधुताई तिडके, सौ.जयश्री कुलकर्णी ह्या महिला प्रवर्गातून, सौ.सपना कंदमवार इतर मागासवर्गीय आणि सौ.सुशिलाबाई सोमवारे ह्या अनुसुचीत जाती जमाती प्रवर्गातून विजयी झाल्या. यावेळी दोन जागा रिक्त राहिल्या आहेत.

### कैलास धुतराज यांना पुरस्कार

**मुदखेड (प्रतिनिधी)**– महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक संघ नांदेड जिल्हा शाखेच्या वतीने जिल्ह्यातील १६ शिक्षकांना उपक्रमशील शिक्षक या पुरस्काराने गौरविण्यात आले आहे. यामध्ये मेंढका येथील जि.प.शाळेतील शिक्षक यांना उपक्रमशील शिक्षक कैलास धुतराज यांचाही गौरव करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माधवराव पाटील हे होते. प्रमुख पाहुणे म्हणून अप्पर जिल्हाधिकारी बोरगावकर व महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक संघाचे पदाधिकारी, जिल्हाध्यक्ष बहुसंख्य लोक या कार्यक्रमास उपस्थित होते. अप्पर जिल्हाधिकारी बोरगावकर यांनी संविधानिक कर्तव्य व जबाबदारी याविषयी अनमोल मार्गदर्शन केले. हा पुरस्कार मिळाल्याबद्दल कैलास धुतराज यांचे सर्वत्र स्वागत होत आहे.






**नांदेड** : भाजप जंगमवाडी मंडळ अध्यक्षपदी आशिष नेरलकर तर नवा मोंढा मंडळ अध्यक्षपदी भालचंद्र पवळे यांची निवड करण्यात आली. त्यांच्या निवडीबद्दल पुष्पगुच्छ देऊन शुभेच्छा देताना पक्ष निरीक्षक अमोल कदम, माजी महानगराध्यक्ष प्रविण साले, प्रदेश कार्यकारिणी सदस्य मोहनसिंह तौर, विजय गंभीरे, माजी उपमहापौर उमेश पवळे, साहेबराव गायकवाड, अनिल डोईफोडे, सुरेंद्र पाठक, जयेश कुलकर्णी, जनार्दन वाकोडकर, संतोष औंढेकर, गिरीष पत्रे, चंद्रकांत सोनक, योगेश देशपांडे, चेतन सोनक, प्रतिसाद खरात, गजानन नायके, अमित भरणे, दयानंद शामर्थी, संतोष मुळे, सुनील भालेराव, मनोज जाधव, लक्ष्मी वाघमारे, कामाजी, सरोदे, गंगाधर कवडे, बाळू लोंढे, बांगड्या यादव, अविनाश भारती महाराज, प्रल्हाद वडजकर, संग्राम सुर्यवंशी, सुमीत मुराडी आदी दिसत आहेत. (छाया : करणसिंह बैस)

# महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या राज्य निवड समितीच्या अध्यक्षपदी रुपेश पाडमुख

**नांदेड (प्रतिनिधी)**– सांगली येथे पार पडलेल्या डिजीटल मिडीया अधिवेशनात महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाच्या राज्य निवड समिती अध्यक्षपदी नांदेडचे जिल्हा सरचिटणीस तथा दै.समीक्षाचे मुख्य संपादक रुपेश पाडमुख यांची निवड करण्यात आली. संस्थापक तथा राज्य संघटक संजय भोकरे, राष्ट्रीय अध्यक्ष अशोक वानखेडे व प्रदेश सरचिटणीस डॉ.विश्वासराव अरोटे यांच्या हस्ते त्यांना निवडीचे पत्र प्रदान करण्यात आले.



राज्यात पदाधिकाऱ्यांच्या निवडीवर वाद किंवा समस्या निर्माण होतात. वास्तवीक संघटनेच्या रचनेनुसार तालुकाध्यक्षांनी जिल्हाध्यक्षांकडे, त्यांनी विभागीय अध्यक्षांकडे व त्यांनी शेवटी प्रदेशाध्यक्षांकडे म्हणणे, तक्रार व काही समस्या सांगणे क्रमप्राप्त आहे. पदाधिकाऱ्यांनी स्वंयशिस्त लावून आपल्या पदाची आचारसंहिता पाळत पारदर्शकता निर्माण व्हावी व निवड समितीच्या स्तरावर प्रश्न सोडवल्या जावेत म्हणून ही निवड करण्यात आली आहे.

यावेळी प्रदेश उपाध्यक्ष तथा लातूर जिल्हाध्यक्ष अशोक डेडे, राज्य प्रसिध्दी प्रमुख नवनाथ जाधव, मंत्रालयीन पत्रकारसंघाचे अध्यक्ष प्रमोद डोईफोडे यांनी अध्यक्ष खंडूराज गायकवाड, संजय बोपेगावकर, संघटनेचे ब्रँड ॲम्बेसॅडर, संजय फुलसुंदर यासह अनेक पदाधिकारी उपस्थित होते.



**लोहा** : दिवसेंदिवस उन्हाचा कडाका वाढत असून जिवाची लाहीलाही होत आहे. उष्णतेपासून सुटका मिळविण्यासाठी चक्क पाण्याच्या टाकीत बसून बच्चेकंपनी आनंद घेताना छायाचित्रकार विनोद महाबळे यांनी टिपलेला क्षण.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्त महात्मा गांधी बी.एड., एम.एड विद्यालयात पदवीदान सोहळा व निरोप समारंभ

**नवीन नांदेड (प्रतिनिधी)**– सिडको येतील महात्मा गांधी बि.एड, एम.एड विद्यालयात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती साजरी करण्यात आली. या निमित्त पदवीदान सोहळा व निरोप समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. जवाहरलाल नेहरू समाज कार्य महाविद्यालयाच्या प्रा.डॉ.मनीषा मांजरमकर यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना पदवी प्रदान करण्यात आल्या.



सिडको येथील महात्मा गांधी बि.एड, एम.एड विद्यालयातील बी.एड व एम.एड द्वितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांना निरोप देण्यात आला. यावेळी मार्गदर्शन करतांना डॉ. मनीषा मांजरमकर म्हणाल्या की, विद्यार्थ्यांनी डॉ. बाबासाहेब डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या आदर्श समोर ठेऊन शिक्षण घ्यावे व समता, स्वतंत्र, बंधुता व न्याय या लोकशाहीच्या चार आधार मूल्याचे जीवनात पालन करावे.

नागसेन व मिलिंद या गुरु- शिष्यांना समोर ठेवून बाबासाहेबांनी मिलिंद कॉलेजची स्थापना केली, असेही डॉ. मांजरमकर यांनी सांगितले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. एस.व्ही.घुले होते. विद्यार्थ्यांमध्ये बहू कौशल्य विकसित होत असून त्यांनी जीवनात यशस्वी होण्यासाठी मूल्य शिक्षणाचा वापर करावा व जीवन गतिशील बनवावे असे आवाहन प्राचार्य डॉ. घुले यांनी अध्यक्षीय समारोप करतांना केले. याच कार्यक्रमात सर्वोत्कृष्ट विद्यार्थी व सर्वोत्कृष्ट प्राध्यापक असे पुरस्कार प्रदान करण्यात आले. कार्यक्रमाला प्रा. पाईकराव, प्रा. बेग, प्रा.पत्रे, प्रा. नवघरे, प्रा. सोनकांबळे, दुर्गा कुलकर्णी, नागेश लाठकर, डॉ. बिजले, डॉ. एडके व डॉ. स्नेहल थोरात उपस्थित होते.

कपिल ठोके व मंजूषा गजभारे यांनी सूत्रसंचालन केले. शेवटी सांस्कृतिक कार्यक्रम घेण्यात आला. कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील बी.एड. आणि एम.एडच्या विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले.

पान १ वरून...

### डॉ. शिरिष वळसंगकरांच्या...

डॉ. वळसंगकर यांनी आत्महत्या करण्यापूर्वी लिहिलेल्या चिठ्ठीत या महिलेच्या नावाचा उल्लेख करत आरोपी महिलेमुळेच टोकाचे पाऊल उचलत असल्याचा आरोप केला होता. सूत्रांच्या माहितीनुसार शनिवारी रात्री दहाच्या सुमारास पोलिसांनी महिलेवर गुन्हा दाखल करत कोर्टाच्या परवानगीने रात्रीतून महिलेला अटक केली होती.

सोलापुरातील प्रसिद्ध न्यूरो फिजिशियन डॉ. शिरीष वळसंगकर यांना आत्महत्या करण्यास प्रवृत्त करणारी आरोपी महिलेला तीन दिवसांची पोलीस कोठडी सोलापूर सत्र व दिवाणी न्यायालयाने सुनावली आहे. न्यायाधीश तथा न्यायदंडाधिकारी दीपक कंखरे यांनी ही शिक्षा सुनावली. आरोपी महिला ही डॉ. वळसंगकर यांच्या रुग्णालयात प्रशासकीय अधिकारी म्हणून कार्यरत होती. तिला कामावरून काढल्याने आरोपी महिलेने डॉक्टर वळसंगकर यांना स्वतः आत्महत्या करण्याचे धमकी दिल्याची प्राथमिक माहिती आहे. आरोपी महिलेने मृत डॉक्टरांना नेमका कसा त्रास दिला? या प्रकरणात आणखी कोणी सहभागी आहेत का? याचा तपास करायचा असल्याने महिलेला पोलीस कोठडी सुनावण्यात यावी असा सरकारी पक्षाचा युक्तिवाद होता.

### शिक्षक नेते व्यंकटराव फुलवळे यांना खासजी शिक्षक महासंघाकडून श्रध्दांजली

**लोहा (प्रतिनिधी)**– शिक्षक नेते व्यंकटराव फुलवळे यांचे दि. १९ रोजी निधन झाले. त्यांच्या निधनाबद्दल महाराष्ट्र राज्य राजमान्य खाजगी अनुदानित प्राथमिक शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी महासंघ शाखा नांदेड यांच्यावतीने दुःख व्यक्त करून भावपुर्ण श्रद्धांजली वाहण्यात आली.



धाडसी, निर्भिड व साम्यवादी विचारसरणीचे असलेले व्यंकटराव फुलवळे यांनी खाजगी अनुदानित प्राथमिक शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांना न्याय मिळवून देण्यासाठी तहहयात प्रयत्न केले. त्यांनी अनेक आंदोलनात सहभाग घेतला होता. राज्य राजमान्य खाजगी अनुदानित प्राथमिक शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी महासंघाचे, प्रमुख मार्गदर्शक जि. एस.चिटमलवार राज्य उपाध्यक्ष हरिहर चिवडे, जिल्हाध्यक्ष हरीभाऊ चव्हाण, कार्याध्यक्ष लक्ष्मणराव जाधव, सचिव हणमंतराव डाकोरे, उपाध्यक्ष दिगांबर केंद्रे, अशोक झगडे, सौ. चित्ररेखा गोरे, बसवेश्वर मंगनाळे, मठपती, गंगाधर मेठदेवरू, वैजेनाथ दमकोंडवार, एम. जी. वडले, शोभाताई नळगे, दिगांबर वाघमारे, मनोज पाटील, मिर्झा बेग, विठ्ठल चंदनकर, संदिप संगनववार, सुर्यकांत लुंगारे, दतात्रय देशमुख, शिवाजी जाधव, राजेश्वर एकनाथ, चंद्रकांत यांनी श्रध्दांजली वाहिली.

# आर्य वैश्य महासभा उपाध्यक्षपदी सूर्यकांत कोटगिरे, जिल्हा सदस्यपदी नितीन कोंडावार यांची निवड

**लोहा (प्रतिनिधी)** – आर्य वैश्य समाज महासभेची रविवारी नांदेड येथील वासवी भवन येथे बैठक घेण्यात आली. या बैठकीत सर्वानुमते आर्य वैश्य महासभा उपाध्यक्षपदी सूर्यकांत कोटगिरे, जिल्हा सदस्यपदी नितीन कोंडावार यांची बिनविरोध निवड करण्यात आली.

२०२५ – २८ या कालावधीसाठी नांदेड जिल्हा ग्रामीणच्या नांदेड जिल्हा ग्रामीण आर्य वैश्य महासभेच्या कार्यकारिणीची बिनविरोध निवड रविवारी पार पडली. यावेळी निवडणूक प्रक्रिया राज्य उपाध्यक्ष नंदकुमार मडगुलवार, राज्य बांधकाम समिती सचिव सदानंद मेडेवार, राज्य संघटक प्रदीप कोकडवार आणि मावळते जिल्हाध्यक्ष विजयकुमार कुंचनवार यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाली.



उर्वरित कार्यकारिणी मध्ये उपाध्यक्षपदी सूर्यकांत कोटगिरे जिल्हा सदस्य म्हणून नितीन कोंडावार यांची म्हणून निवड करण्यात आली आहे. यावेळी महाराष्ट्र आर्य वैश्य महासभेचे महासचिव गोविंदराव बिडवई, माजी अध्यक्ष एकनाथराव मामडे यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी राज्यकार्यकारिणीच्यावतीने नुतन कार्यकारिणीतील पदाधिकाऱ्यांचा सत्कार करण्यात आला.

तसेच लोहा आर्य वैश्य समाजाचे अध्यक्ष दिनेश तेललवार, माझी नगराध्यक्ष किरण वट्टमवार, व्यापारी असोसिएशनचे अध्यक्ष नामदेव कटकमवार, उद्योजक तुकाराम कोटलवार, उद्योजक प्रशांत पातेवार, बालाजी कोटगीरे, लक्ष्मीकांत बच्चेवार यासह अनेक व्यापाऱ्यांनी नितीन कोंडावार व सूर्यकांत कोटगीरे यांचे अभिनंदन करून पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या आहेत.

### सिडकोत उंबरेश्वर महादेव मंदिराच्या वर्धापन दिनानिमित्त आज विविध धार्मिक कार्यक्रम

**नांदेड (प्रतिनिधी)** – सिडको येथील वसंतराव नाईक महाविद्यालयासमोरील मैदानावर उंबरेश्वर महादेव मंदिराच्या वर्धापन दिनानिमित्त दि. २१ एप्रिल रोजी विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.



सकाळी ८.३० वाजता पिंटू महाराज यांच्या हस्ते अभिषेक होणार आहे. त्यानंतर भजनी महिला मंडळाचे भजन होणार आहे. दुपारी १ वाजेपासून महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमात भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून धार्मिक कार्यक्रम व महाप्रसादाचा लाभ घ्यावा, असे आवाहन अलका कोटलवार, रेणुका यन्नावार, राणी दमकोंडवार ज्योती पोटपेलवार, प्रयाग घोरपडे, आरती कंठाळे, कमल गवते, विजया मिराशे, ध्रुपदा वाघमारे, प्रियंका कवडे, राधिका माळवतकर, माधुरी चौधरी, रुपाली गुंडले, शांता वाघमारे, शिवांगी जमदाडे, सुकेश गुंडले, ईश्वर माळवतकर यांनी केले आहे.

### हभप प्रभाकर महाराज पुयड यांच्या काल्याच्या किर्तनाने अखंड हरिनाम सप्ताह व भागवत कथेची सांगता



**नवीन नांदेड (प्रतिनिधी)** – असदवन येथे दि. १२ ते १९ दरम्यान सुरु असेल्लाय अखंड हरिनाम सप्ताह, ज्ञानेश्वरी पारायण कथा, श्रीमत भागवत कथा ज्ञानयज्ञ सोहळ्याचा दि. १९ एप्रिल रोजी मोठ्या उत्साहात समारोप करण्यात आला. या निमित्त श्रीमद् भागवत कथा प्रवक्ता हभप श्री प्रभाकर महाराज पुयड मिश्री पिंपळगाव यांचे काल्याचे कीत्रन झाले.

सप्ताह काळात दररोज काकडा भजन, ज्ञानेश्वरी पारायण, गाथा भजन, श्रीमद् भागवत कथा, हरिपाठ, हरि किर्तन व जागर कार्यक्रम घेण्यात आले. या अखंड हरिनाम सप्ताह मध्ये रामायण कथाकार हभप बाबु किशन महाराज कुदळेकर, गुरू कृपा किंमत हभप शंकर महाराज सोनमांजरीकर, हभप कोंडीबा महाराज पासदगावकर, जोग महाराज, हभप संतोष महाराज, गुरुवर्य रूद्रगिर महाराज किवळेकर, हभप भगवान गुरूजी ढोणे, हभप शिवाजी महाराज करखेलीकर यांचे हरि किर्तन झाले. दि. १९ एप्रिल रोजी हभप प्रभाकर महाराज पुयड यांच्या सकाळी काल्याचे किर्तनाने सप्ताहाची सांगता झाली.

यावेळी ग्रामीण पोलीस स्टेशन पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर, शिवसेना शिंदे गटाचे दक्षिण जिल्हाप्रमुख तथा माजी उपमहापौर विनय पाटील गिरडे, माजी नगरसेविका ललिता शिंदे यांच्या सह महिला नागरीक युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते. महाप्रसादाचा भाविकांना लाभ घेतला. अखंड सप्ताह यशस्वीतेसाठी गावकरी मंडळी असदवन यांनी परिश्रम घेतले.

### इंदिरा इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी पॉलिटेक्निकमध्ये डॉ. आंबेडकर जयंती साजरी



**नवीन नांदेड (प्रतिनिधी)**– सहयोग सेवाभावी संस्था संचलित इंदिरा इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी पॉलीटेक्निक महाविद्यालयात महात्मा ज्योतिबा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त विविध कार्यक्रम घेण्यात आले.

संस्थेचे सचिव डॉ. संतुकराव हंबर्डे यांच्या मार्गदर्शनाखाली महाविद्यालयात विद्यार्थ्यांच्या वतीने सलग आठ तास वाचन उपक्रम, प्रश्नमंजुषा, पोस्टर मेकिंग, इत्यादी स्पर्धांचे घेण्यात आल्या.

सदरील कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ईशान अग्रवाल, प्राचार्य शिवानंद बारसे, रिजिस्ट्रार शंकर किरकाण, सर्व विभाग प्रमुख, संयोजक समितीतील प्रा. जोंधळे, प्रा. थूल, प्रा. गुरप्रीत सिंग व इतर शिक्षक कर्मचारी, विद्यार्थी प्रतिनिधी वैभव निलेवाड, श्रेया गोवंदे व इतर विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले.

विविध स्पर्धातील विद्यार्थ्यांना प्रथम व द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक व प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले.

# पतंजलीची जिल्हा बैठक उत्साहात संपन्न

**नांदेड (प्रतिनिधी)** – पतंजलीच्या नांदेड शाखेची दि. १७ एप्रिल रोजी हॉटेल विसावा येथे बैठक उत्साहात पार पडली. या बैठकीत जिल्हा पतंजलि योग परिवाराच्या कार्याचा आढावा घेण्यात आला. तसेच नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचा सम्मान करण्यात आला.

यावेळी राज्य प्रभारी भारत स्वाभिमान दिनेश राठोड, राज्य प्रभारी पतंजलि योग समिति अनिल अमृतवार, राज्य प्रभारी युवा भारत शंकर नागापुर, राज्य कार्यकारिणी सदस्य सत्यनारायण अनमदवार, संजय चाफळे, कुंडलीक निर्मळे, पंढरीनाथ कंठेवाड, माजी राज्य प्रभारी दत्तात्रय काळे यांची प्रमुख उपस्थिती होती.

राम शिवपनोर यांनी प्रास्ताविकातून जिल्हा योग समितीच्या कार्याची माहिती दिली. महारुद्र माळगे यांनी सूत्रसंचालन केले.



कार्यक्रमासाठी सर्वश्री बालाजी वारकड, शिवाजीराव पेन्सलवार, शिवाजीराव शिंदे, राम कृष्ण चक्रवार, दिगंबर पाटिल, रावसाहेब साजने, नंदिनी चौधरी, चंदा हळदे पाटील, अनीता डोळस, उर्मिला साजने, महानंदा माळगे, किशन भंवर, सदाशिव बुटले पाटिल, वीरभद्र स्वामी, विठ्ठलराव काळे, नीलकंठ मोर, शंकर स्वामी, बसवेश्वर मडके, शहादत गिरी, धोंडु पाटिल, कैलाश राठौड, लक्ष्मण परडे, सुरेश लंगड़ापूरे, सच्चिदानंद रामदिनवार, वेंकट बिडवई, दिलीप चौधरी, बालाजीराव कहाळेकर, राजेश्वर नुचे, दिगंबर भोंसले, राजेंद्र कांबळे, अशोक पुंडगे, पांडुरंग निवृत्ति, दिलीप कदम, अनिल कमीनवार, नारायण कुलकर्णी, गंगाधर लोनकर, नीलकंठ यादव, नामदेवराव मोहिते, बंकटेश कोटगीरे, रमेश बंडेवार, सेल सुदाम सेळे, नंदाताई आठवले यांच्या असंख्य योगसाधकांची उपस्थिती होती.

# प्रगतीमंत्र

## अ‍ॅनेस्थेसियोलॉजी... प्रतिष्ठेचे करिअर

**अ‍ॅनेस्थेसियोलॉजी हा औषधाचा अभ्यास करणाऱ्या लोकांसाठी करिअरचा एक चांगला पर्याय आहे. वैद्यकीय क्षेत्रातील हे एक प्रतिष्ठित आणि किफायतशीर क्षेत्र आहे ज्यासाठी विशेष प्रशिक्षण आवश्यक आहे. शस्त्रक्रियेच्या प्रक्रियेत 'भूलतज्ज्ञ' खूप महत्त्वाची भूमिका बजावत असून, ते रुग्णांच्या शस्त्रक्रियेदरम्यान त्यांच्या महत्त्वाच्या लक्षणांचे निरीक्षण करतात. वास्तविक, 'भूलतज्ज्ञ' हा एक डॉक्टर असतो जो शस्त्रक्रियेपूर्वी रुग्णाला द्यावयाच्या औषधांचा आणि औषधांचा डोस ठरवतो. जर तुम्हाला वैद्यकशास्त्रात रस असेल, तर तुम्ही या क्षेत्रात करिअर करून चांगली कमाई करू शकता. 'अ‍ॅनेस्थेसियोलॉजिस्ट' किंवा 'अ‍ॅनेस्थेटिस्ट' कसे बनायचे? त्यासाठी कोणता कोर्स करायचा? या क्षेत्रात करिअरला किती वाव आहे? हे व्यावसायिक किती कमावतात? याबद्दल जाणून घेऊया...**



### ✓ 'अ‍ॅनेस्थेसियोलॉजिस्ट' कामाचे स्वरुप

कोणत्याही शस्त्रक्रियेपूर्वी भूलतज्ज्ञाचा सल्ला आवश्यक असतो. रुग्णाच्या आरोग्याच्या मूल्यांकनावर आधारित तो भूल आणि औषधांचा डोस ठरवतो. शस्त्रक्रियेदरम्यान ते खात्री करतात की रुग्ण वेदना किंवा अस्वस्थता अनुभवत नाही. वेगवेगळ्या शस्त्रक्रियेदरम्यान, रुग्णाच्या वेदना कमी करण्यासाठी वेगवेगळ्या पद्धतींचा अवलंब केला जातो. ते रुग्णाच्या हृदयाचे ठोके, शरीराचे तापमान, ऑक्सिजन पातळी, रक्तदाब इत्यादींवर लक्ष ठेवतात. हे शस्त्रक्रियेनंतरही रुग्णाची स्थिती सामान्य करण्यास मदत करतात.

### ✓ नोकरी अन् करिअर संधी

भूलतज्ज्ञ करिअरमध्ये संधींची कमतरता नाही. ते कोणत्याही वैद्यकीय विद्यापीठ, संस्था, सार्वजनिक किंवा खासगी क्षेत्रातील रुग्णालयात त्यांची सेवा देऊ शकतात. अ‍ॅनेस्थेसियोलॉजी कोर्सेस अनेक संस्था, विद्यापीठे अ‍ॅनेस्थेसियासाठी अभ्यासक्रम ऑफर करतात. ज्यामुळे विद्यार्थ्यांना अ‍ॅनेस्थेसियोलॉजिस्ट आणि अ‍ॅनेस्थेसियोलॉजिस्टचा व्यवसाय करण्याची संधी मिळते. या क्षेत्रात पदवीपूर्व आणि पदव्युत्तर अभ्यासक्रम उपलब्ध आहेत. भूलतज्ज्ञ होण्यासाठी वैद्यकशास्त्रातील सर्व विशेष विषयांवर चांगली पकड आणि व्यावहारिक ज्ञान असणे आवश्यक आहे. एमबीबीएस पदवीसाठी बारावीनंतर NEET परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक आहे. एमबीबीएस केल्यानंतरच तुम्ही भूलतज्ज्ञ म्हणून करिअर करू शकता.

### ✓ भूलतज्ज्ञचा पगार किती?

या क्षेत्रातील भूलतज्ज्ञ उमेदवारांना आकर्षक पगार मिळतो. तथापि, इतर कोणत्याही क्षेत्राप्रमाणे, येथे पगार देखील उमेदवाराच्या अनुभवावर, नोकरीचे स्थान आणि नोकरी प्रोफाइलवर अवलंबून असतो. भारतातील अ‍ॅनेस्थेसियोलॉजिस्टचे सरासरी वेतन पॅकेज सुमारे १२ लाख रुपये आहे. करिअरच्या सुरुवातीला ३० ते ५० हजार रुपये दरमहा उपलब्ध असतात. तासाभराचे काम करणारे अनुभवी अ‍ॅनेस्थेसियोलॉजिस्ट बरेच पैसे मिळवू शकतात.

## इंटर्नशिपदरम्यान 'या' टिप्स करा फॉलो

- गंभीर व्हा : इंटर्नशिप दरम्यान सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे कामाच्या बाबतीत गंभीर असणे. प्रत्येक गोष्टीला गांभीर्याने घ्या. इंटर्नशिप ही व्यावसायिक जीवनाची पहिली पायरी आहे. जर तुम्ही कामाबद्दल गांभीर्य दाखवले आणि सतर्कता बाळगली तर ही गोष्ट तुमच्या वरिष्ठांच्या निदर्शनास नक्कीच येईल. ज्यामुळे तुम्हाला येणाऱ्या भविष्यात आणखी चांगल्या संधी मिळू शकतात.
- वर्क कल्चर समजून घ्या : या काळात आपल्याला वर्क कल्चर समजते. कंपनीच्या कामाशी जुळवून कसे काम करावे? कंपनीचे जॉब मार्केट काय आहे? तुम्हाला कोणते प्रोजेक्ट हवे आहेत? त्यावर कसे काम करावे लागेल? एका ठराविक मुदतीत संपूर्ण काम कसे पूर्ण करायचे हे समजून घ्या. व्यावसायिक जीवनातील प्रत्येक लहान- मोठ्या गोष्टी या इंटर्नशिप दरम्यान शिकवल्या जातात. त्यामुळे हा टप्पा प्रत्येक उमेदवारासाठी खूप महत्त्वाचा असतो.
- गोष्टी शिकण्यात स्वारस्य दाखवा : हा असा टप्पा आहे जिथे तुम्ही सर्वात जास्त शिकू शकता. त्यामुळे तुमच्याकडे काम नसले तरीही तुमच्या वरिष्ठांशी स्वतः बोलण्याचा प्रयत्न करा. त्यांना कळू द्या की तुम्हाला प्रोजेक्ट्सवरही काम करायचे आहे. तुमची आवड दाखवा. ज्यामुळे त्यांना कळेल की तुम्हाला नवीन गोष्टी शिकण्यात रस आहे. यामुळे तुम्ही कामाला घाबरत नाही, तर समोरून स्वतःहून काम करा.
- डेडलाइन पाळा : व्यावसायिक जीवनातील सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे डेडलाइन, कारण ठरलेल्या डेडलाइनमध्ये काम पूर्ण झाले नाही तर काही उपयोग होणार नाही. त्यामुळे काम वेळेत पूर्ण करून ते पूर्ण करण्याचा प्रयत्न करा. असे करण्यात अयशस्वी झाल्यास तुमच्या बॉस आणि वरिष्ठांवर चांगली छाप पडणार नाही. त्यामुळे या गोष्टीची विशेष काळजी घ्या.

## 'एचआर'वरच असं पाडा इंम्प्रेशन!

**कॉलेज सोडल्यानंतर पहिल्या नोकरीमध्ये तुम्हाला अनेक आव्हाने आणि संघर्षांना सामोरे जावे लागते. मग ते मुलाखतीशी संबंधित किंवा कामाशी संबंधित आव्हान असू शकते. मुलाखतीदरम्यान कोणते प्रश्न विचारले जातील? आणि त्याची तयारी कशी करावी? इत्यादींचा आपण अनेकदा विचार करत असतो. या सर्व प्रश्नांची उत्तरे आम्ही या लेखाद्वारे देत आहोत. हे प्रश्नच एचआरद्वारे (Human Resource, HR) फ्रेशर्सना (Freshers) विचारले जातात. या प्रश्नांच्या मदतीने, फ्रेशर्स मुलाखतीदरम्यान सहज आपले पहिले इंम्प्रेशन पाडू शकतात.**

### तुम्ही तणाव आणि दबाव कसे हाताळता?

ताणतणाव आणि दडपण हे कामाच्या आयुष्यातील एक भागआहे. इथले स्ट्रेस आणि प्रेशर हे महाविद्यालयीन जीवनातील तणावापेक्षा खूप वेगळे आहेत. फ्रेशर्ससाठी एचआर मुलाखतीत विचारलेला हा महत्त्वाचा प्रश्न आहे. तुम्ही तणाव आणि दडपणाखाली कसे काम करता, हे या प्रश्नाच्या माध्यमातून तुमच्याकडून जाणून घेण्याचा प्रयत्न करण्यात येतो.

### स्वतःबद्दल सांगा

'स्वतःबद्दल सांगा' हा एक असा प्रश्न आहे जो नेहमी विचारला जातो. समोरची व्यक्ती नवीन आहे की अनुभवी आहे, हे या प्रश्नाचे उत्तर देण्यावरून कळते. हा प्रश्न उमेदवार आणि मुलाखतकार यांच्यातील संभाषणाला सुरुवात म्हणून काम करतो. जेव्हा एचआर किंवा मुलाखतकार तुम्हाला असे प्रश्न विचारतो याचा अर्थ असा होतो की, त्याला तुमच्याबद्दल जाणून घ्यायचे आहे. ज्याचा CV मध्ये उल्लेख नसेल.

### हेच का निवडले?

फ्रेशर्ससाठी एचआर मुलाखतीच्या इतर प्रश्नांपैकी, 'तुम्ही हे करिअर का निवडले?' हा प्रश्न सर्वात महत्वाच्या प्रश्नांपैकी एक आहे. उमेदवाराला या क्षेत्रात खरोखर रस आहे की नाही, हे जाणून घेण्यासाठी भरती करणारे हा प्रश्न विचारतात.

### ड्रीम जॉब काय?

तुमचा ड्रीम जॉब काय आहे? हा एचआरने विचारलेल्या सर्वात लोकप्रिय मुलाखतीच्या प्रश्नांपैकी एक प्रश्न आहे. विद्यार्थ्यांनी मुलाखतीला जाण्यापूर्वी या प्रश्नाची तयारी करणे आवश्यक आहे. तुमच्या प्रश्नातूनच उपप्रश्न तयार होणार आहेत. त्यामुळे या प्रश्नाचे प्रामाणिकपणे उत्तर द्यावे.



### इतर काही प्रश्न आहेत का?



एचआर मुलाखतीच्या प्रश्नांपैकी हा एक प्रश्न आहे. ज्याची तयारी फ्रेशर्सनी आधीच केली पाहिजे. भरती करणारे नेहमी हा प्रश्न विचारतात. या प्रश्नामुळे फ्रेशर्सच्या मनातील सर्व शंका दूर होऊ शकतात.

### पगार अपेक्षा

हा सर्वात लोकप्रिय प्रश्नांपैकी एक आहे. जो तुम्हाला प्रत्येक नोकरीच्या मुलाखतीत विचारला जाईल. पण या प्रश्नाचे उत्तर अतिशय काळजीपूर्वक दिले पाहिजे. आपला आधीचा पगार, आधीच्या नोकरीत मिळणारी संभाव्य पगारवाढ, मेडिक्लेम, पीएफ असे मिळणारे भत्ते, या सर्वांचा विचार करुन ठेवा. म्हणजे तुम्हाला या प्रश्नाचे उत्तर देणे सोपे पडेल.

## पॉलिटेक्निकचा पर्याय

**सरकारी नोकऱ्या आणि करिअरसाठी पॉलिटेक्निक डिप्लोमा कोर्स हा सर्वोत्तम पर्याय आहे. वास्तविक, पॉलिटेक्निक अभ्यासाच्या क्षेत्रात रोजगाराच्या दृष्टिकोनातून प्रचंड क्षमता आहे. हा तांत्रिक अभ्यासक्रम घेऊन विद्यार्थी विविध क्षेत्रात सरकारी नोकऱ्या करू शकतात, मोठ्या खासगी आणि सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगांमध्ये नोकरी मिळवू शकतात किंवा स्वयंरोजगार सुरू करू शकतात.**

दहावी आणि बारावीची परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतरच तरुणांना पॉलिटेक्निक प्रवेश परीक्षेद्वारे पॉलिटेक्निक अभ्यासक्रमाला प्रवेश घेता येतो. हा अभ्यासक्रम तीन वर्षांचा असून कौशल्य विकासाबरोबरच प्रात्यक्षिक प्रशिक्षणही दिले जाते. तुमच्या आवडीनुसार पॉलिटेक्निक कोर्सला प्रवेश घेऊन तुम्ही या क्षेत्रात करिअर करू शकता. विद्यार्थी सरकारी आणि खासगी संस्थांमधून पॉलिटेक्निक अभ्यासक्रम करू शकतात. वेगवेगळ्या पॉलिटेक्निक अभ्यासक्रमांचा कालावधी वेगवेगळा असतो.



### पॉलिटेक्निक अभ्यासक्रम काय आहेत?

हा एक प्रकारचा तांत्रिक प्रशिक्षण डिप्लोमा कोर्स (Technical Training Diploma Course) आहे जो तांत्रिक कौशल्य अभ्यासक्रमाच्या श्रेणीत येतो. दहावी आणि बारावी उत्तीर्ण झाल्यानंतर विद्यार्थी दोन आणि तीन वर्षांच्या पॉलिटेक्निक अभ्यासक्रमांना प्रवेश घेऊ शकतात. पॉलिटेक्निक अभ्यासक्रमानंतर विद्यार्थ्यांना थेट बी.टेक.च्या द्वितीय वर्षात प्रवेश मिळू शकतो. देशात पॉलिटेक्निक अभ्यासक्रम करण्यासाठी अनेक सरकारी आणि खाजगी महाविद्यालये आहेत. अनेक राज्यांमध्ये पॉलिटेक्निक प्रवेशासाठी राज्यस्तरीय संयुक्त प्रवेश परीक्षाही घेतली जाते.

### पॉलिटेक्निक कोर्सला प्रवेश कसा घ्यावा?


प्रत्येक राज्यात पॉलिटेक्निक डिप्लोमाच्या प्रवेशासाठी ऑनलाइन नोंदणी करावी लागते. त्याची माहिती राज्यांच्या पॉलिटेक्निक कॉलेजांच्या अधिकृत वेबसाइटवर तपशीलवार दिली आहे. ऑनलाइन नोंदणीमध्ये नाव, पत्ता, बोर्डाचे नाव, गुणांचा तपशील असलेला ऑनलाइन अर्ज सादर केला जातो आणि त्यानंतर फी भरावी लागते. परीक्षेच्या काही वेळापूर्वी प्रवेशपत्र ऑनलाइन दिले जाते. पॉलिटेक्निकमध्ये प्रवेश घेण्यासाठी लेखी परीक्षा असते.

### सरकारी नोकरीच्या संधी

पॉलिटेक्निक केल्यानंतर, गॅस अथॉरिटी ऑफ इंडिया लिमिटेड, भारत हेवी इलेक्ट्रिकल्स लिमिटेड, भारत संचार निगम लिमिटेड, एनटीपीसी, एचसीएल, कोल इंडिया, इंडियन रेल्वे, ओएनजीसी, डीआरडीओ इत्यादी क्षेत्रांमध्ये नोकरीच्या संधी उपलब्ध आहेत. सार्वजनिक क्षेत्राप्रमाणे, अनेक खासगी क्षेत्रातील कंपन्या देखील पॉलिटेक्निक डिप्लोमा असलेल्या उमेदवारांना नियुक्त करतात.

### पॉलिटेक्निकमधील काही लोकप्रिय डिप्लोमा कोर्सेस

- कॉम्प्युटर सायन्स आणि इंजिनीअरिंग
- सिव्हील इंजिनीअरिंग
- ऑटोमोबाईल इंजिनीअरिंग
- इलेक्ट्रॉनिक्स आणि कम्युनिकेशन
- इलेक्ट्रीकल इंजिनीअरिंग
- इंटिरियर डेकोरेशन
- फॅशन इंजिनीअरिंग
- मॅकेनिकल इंजिनीअरिंग



## मॉडेलिंगचे गुण..!



**टीव्हीवर दिसणाऱ्या मॉडेल्स त्यांचे दिमाखदार रॅम्प वॉक पाहून अनेकांना वाटते आपणही मॉडेलिंगमध्ये करिअर करायला हवे. मग एक साधारण असा समज असतो की, फक्त सुंदर चेहऱ्यांनाच ही संधी मिळू शकेल. पण असे काही नाही. ज्या व्यक्तीला कॅमेऱ्याची आवड आहे. जी कष्टाळू पण मेहनती आहे. सुदृढ आहे, अशी कोणतीही व्यक्ती मॉडेल बनू शकते. कारण मॉडेलिंग म्हणजे एक मूकाभिनय असतो. पण अनेकांना मॉडेलिंग म्हणजे फक्त रॅम्पवर चालणे वाटते. यातही अनेक प्रकार आहेत. प्रत्येक प्रकाराच्या मॉडेलिंगमध्ये मूलतः काही गुणविशेष असणे आवश्यक असते...**

- रॅम्प वॉक-रनवे मॉडेल : या प्रकारात मॉडेलची उंची आणि वजन या महत्त्वपूर्ण गोष्टी आहेत. या प्रकारात मॉडेल सडपातळ असणे फार महत्त्वाचे असते. जेव्हा डिझायनर कपडे बनवतात तेव्हा ते असेच मॉडेल निवडतात ज्यांच्यावर ते कपडे सहज बसू शकतील आणि छानही दिसतील. मॉडेलची उंची किमान ५.९ असणे आवश्यक असते. यामध्ये मुलींसाठी शरीराचे माप ३३-२४-३४ हे प्रमाण मानतात. आकर्षक डोळे, रेखीव हनुवटी, मोठे ओठ आणि चांगले केस असणे फार आवश्यक असते. या सगळ्या गोष्टी एकत्रच असल्या पाहिजेत असेही काही नाही. पण जर असतील तर सोन्याहून पिवळे.
- प्रिंट कॅटलॉग मॉडेल : या प्रकारात कोणत्याही मॉडेलची उंची ही किमान ५ फूट ६ इंच एवढी असणे आवश्यक आहे. ६ फूट १० इंचापर्यंत उंची असलेल्या व्यक्ती या प्रकारात मॉडेलिंग करू शकतात. कॅटलॉग मॉडेलिंगमध्ये एकाच दिवशी सुमारे २० ते ३० वेगवेगळ्या कपड्यांवर फोटोशूट करावे लागते. तेवढा संयम असायला हवा. कपडे घातल्यावर ते कशा प्रकारे दिसतील हे ग्राहकांना दाखवावे लागते. यासाठीच हे फोटोशूट केले जाते. या फोटोशूटमुळे कपडे विकत घेताना ग्राहकांना त्याचा अचूक अंदाज येतो.
- कमर्शिअल मॉडेल : मॉडेलिंगमधला हा एक असा प्रकार आहे. ज्यात कोणत्याही प्रकारची वयोमर्यादा नसते. इथे कोणत्याही बांध्याच्या, उंचीच्या मॉडेल काम करू शकतात. एखाद्या प्रोडक्टच्या गरजेनुसार मॉडेल निवडल्या जातात. उदाहरण द्यायचे झाले तर खाद्यपदार्थ, क्रीम, घरगुती वस्तूंच्या जाहिराती, तांत्रिक गोष्टींची जाहिरात इत्यादी.
- फॅशन मॉडेल : रॅम्प मॉडेलना आवश्यक असणारी उंची आणि बांधा इथेही आवश्यक असतो. या मॉडेल फॅशन मासिकात अधिक झळकताना दिसतात.
- स्विमसूट : या प्रकारात ५फूट ६ इंच एवढी उंची आवश्यक असते. यात आकर्षक मॉडेल असणे महत्त्वाचे असते. सडपातळ बांध्याच्या मॉडेलना अधिक पसंती मिळते. प्रत्येक मॉडेल अशा प्रकारचे मॉडेलिंग करतेच असे नाही. त्यामुळे या प्रकारात फार थोड्याचजणी दिसतात.
- स्थूल बांध्यासाठी : हा एक नवीन प्रकार मॉडेलिंगमध्ये आला आहे. केवळ बारीकच नव्हे तर स्थूल बांध्याच्या व्यक्तीसुद्धा मॉडेलिंग करू शकतात. कारण आता अशा व्यक्तींसाठी खास कपड्यांचे कलेक्शन केले जातात. यासोबतच हल्ली गरोदर महिलाही मॉडेलिंग करू शकतात.

### प्रशिक्षण देणाऱ्या संस्था...

या विषयात प्रशिक्षण देणाऱ्या संस्था आहेत का? असा प्रश्न अनेकांना पडतो. त्याचे उत्तर होय असे आहे. परंतु यातील कोणत्याही संस्थेत नोंदणी करायच्या आधी तिथे नेमके कोण शिकवते, तेथील किती मॉडेल्स आजपर्यंत या व्यवसायात आल्या आहेत. तेथील प्रशिक्षकांचे फॅशन इंडस्ट्रीत कितपत योगदान आहे, हे लक्षात घेऊन मगच त्या संस्था निवडा. नवी मुंबईमध्ये वाशी येथे कोरिओग्राफर निशा हराळे, बंगळुरू येथे प्रसाद गडप्पा, पुणे येथे संदीप धार्मा तर दिल्ली येथे नोयनिका चॅटर्जी या व्यक्ती त्यांच्या संस्थेमार्फत मॉडेलिंगचे प्रशिक्षण देत असतात. शेवटचा पण महत्त्वाचा मुद्दा म्हणजे मॉडेलिंगच्या क्षेत्राकडे कोणत्याही पूर्वग्रहदूषीत नजरेने बघू नका. प्रत्येक क्षेत्रात चांगली, वाईट माणसे असतातच. आपल्याला नेमके काय करायचे आहे, काय करायचे नाही हे डोक्यात पक्के करा. त्यानुसारच वागा. कामाशी प्रामाणिक राहा. मग यश तुमचेच आहे.

## ड्रायव्हिंग शिकताना...

- चालकाचं डोकं आणि आरसा पाहा : समोरच्या गाडीचा चालक काय करतो आहे, याचा त्याच्या बाजूच्या आरशातून आणि समोर दिसणाऱ्या डोक्यावरून अंदाज बांधता येतो. काहीवेळा सिग्नल किंवा गर्दीत असताना तो चटकन उजवीकडे वळतो. त्यानंतर सिग्नल देतो. त्याच्या हालचाली पाहून हळूहळू अंदाज येत जातो. तसंच आपणही आपल्या गाडीच्या आरशांकडे पाहत राहावं. त्यातून मागे असलेल्या गाडीचा चालक काय करतो आहे, हे समजतं.
- ब्रेक्सकडे लक्ष द्या : ब्रेक दाबणं तसं काही अवघड नाही. नवे चालक काही वेळा ब्रेक दाबताना अडखळतात. गाडीचा वेग कमी होण्याऐवजी गाडी पटकन थांबते. त्याची त्यांना थोडी भीती वाटते; पण भीतीचं कारण नाही. ब्रेक किती जोरात, कसा दाबायचा याचा लवकर अंदाज येतो. त्यामुळे ब्रेक मारताना टेन्शन घेऊ नका.
- तुम्ही दिसत राहा : पावसाळ्यात हा मुद्दा महत्त्वाचा आहे. अंधारून आल्यानंतर आपले कपडे गडद असतील, तर इतर गाड्यांना आपण चटकन दिसणार नाही. पावसाळी फ्लोरोसंट रंगाचं जर्किन वापरा. हेल्मेटचा रंगही चटकन दिसेल असा असावा. अंधारामध्ये आपण इतर गाड्यांना दिसायला हवं, हे महत्त्वाचं. टू-व्हीलरला रिफ्लेक्टर आणि टेल लॅम्प असतात; पण कदाचित त्यावर चिखल उडलेला असू शकतो, हे लक्षात घ्यायला हवं. वाहतुकीचा वेग मंदावल्यास समोरच्या गाडीच्या उजवीकडे थांबा. त्यामुळे पुढे जाण्याचा मार्ग मिळेल. कार एकामागे एक थांबतात. टू-व्हीलर्सना त्यांच्या बाजूने जाणं शक्य असतं. त्यामुळे त्याचा अंदाज घेऊन थांबावं. गाडी चालवताना आजूबाजूचा परिसर नीट पाहा. काही वेळा मुख्य रस्त्याच्या बाजूने छोट्या छोट्या गल्ल्यांमधून अचानक वाहनं येतात.
- रस्ता पाहा : टू-व्हीलर चालवताना हेही महत्त्वाचं असतं. काही वेळा रस्त्यावर तेल सांडलेलं असतं. पावसाळ्यात रस्ता निसरडा होतो. त्यामुळे त्याकडेही लक्ष द्यावं. बरेचदा समोरच्या गाड्या अचानक वळून, म्हणजे एखादा भाग टाळून पुढे जात असतात. त्या तशा जातात; कारण रस्त्यावर काहीतरी असतं. काही वेळा त्या गाड्यांच्या वळण्याकडे लक्ष न देता एखादा सरळ जातो आणि घसरतो. तेव्हा आजूबाजूच्या वाहनांवरूनही रस्त्याचा अंदाज बांधा.

## जाहीर पत्रक

**नगर पंचायत हिमायतनगर**

जा.क्र./६६३

**नाव परिवर्तन करणे बाबत**

**वार्ड क्र.१२ मामक्र/ २३६/अ/२**

या जाहिर प्रगटनाच्याअधारे सर्व जनतेस कळविण्यात येते की,शेख वसमी शेख महेमुद, मोहमद नईमोद्दीन शेख महेमुद रा.हिमायतनगर ता.हिमायतनगर यांनी या कार्यालयात अर्ज सादर केला आहे की, घर/दुकान/ प्लॉट २३६/अ/२ वार्ड नंबर १२ श्री.शेख युनूस शेख महेमुद यांच्या नावाने असलेले जायजाद यांनी हिबानामा २०२५ दिनांक ८/४/२०२५ च्या विक्री घेतले आहे.किंवा वारसा हक्काने प्राप्त झाली आहे. तरी त्यांचे रजिस्ट्रर रिव्हीजन नगरपंचायत नोंद घेण्यात येत आहे. या संबंधी कोणास उजर असल्यास त्यांनी १५ दिवसाच्या आत आपला उजर योग्य पुराव्यासह लेखी दाखल करावा.नसता मुदत संपल्यावर अर्जदाराच्या नावे नोंद रजिस्ट्रर मध्ये नोंद घेण्यात येईल. चुर्तसिमा पुर्वे -रोड, पश्चिम: शेख महेमुद , दक्षिण :नबि साब , उत्तर :महेबुब

**मुख्याधिकारी**
**नगरपंचायत हिमायतनगर**

## जाहीर पत्रक

**नगर पंचायत हिमायतनगर**

जा.क्र./६६५

**नाव परिवर्तन करणे बाबत**

**वार्ड क्र.१८ मामक्र/ ६५**

या जाहिर प्रगटनाच्याअधारे सर्व जनतेस कळविण्यात येते की,अनिता मारोती वाघमारे, संदीप मारोती गव्हाळे रा.सरसम दरेगाव ता.हिमायतनगर यांनी या कार्यालयात अर्ज सादर केला आहे की, घर/दुकान/ प्लॉट ६५ वार्ड नंबर १८ साधना अरूण कपाळे च्या नावाने असलेले जायजाद यांनी खरेदी पत्रक नंबर ४६५/२०२५ दिनांक ७/४/२०२५ च्या विक्री घेतले आहे.किंवा वारसा हक्काने प्राप्त झाली आहे.तरी त्यांचे रजिस्ट्रर रिव्हीजन नगरपंचायत नोंद घेण्यात येत आहे. या संबंधी कोणास उजर असल्यास त्यांनी १५ दिवसाच्या आत आपला उजर योग्य पुराव्यासह लेखी दाखल करावा.नसता मुदत संपल्यावर अर्जदाराच्या नावे नोंद रजिस्ट्रर मध्ये नोंद घेण्यात येईल.

चुर्तसिमा पुर्वे -रोड, पश्चिम: -प्लॉट नंबर ५६, दक्षिण :बळीराम राठोड -, उत्तर :- कुसूम ,

**मुख्याधिकारी**
**नगरपंचायत हिमायतनगर**

जा. क्र. १२ /नपामु/२०२५
दि.१७/०४/२०२५

## जाहीर प्रगटन

मुखेड नगर परिषद मुखेड

विषय :- नांव परिवर्तन करणे बाबत.

या जाहीर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यांत येते की, अर्जदार श्री. तिरुपती गंगाराम मष्कालवाड श्रीनिवास गंगाराम मष्कालवाड रा. मुखेडचे असुन मुखेड नगर परिषदेच्या हद्दीतील घर नं. ५२६ पै. वार्ड नं (०५) हे श्री. विजया आनंदराव तेलंग रा. मुखेड यांचे कडुन कायमचे खरेदी खत/कोर्टडिक्री/------करुन घेतले असुन खरेदी खताची कोर्ट डिक्रीची/------- झेरॉक्स प्रत अनुसुची फॉर्म २ / अनुसुची फॉर्म ३ अर्जासोबत देऊन सदरिल घर या खरेदी खताआधारे/कोर्ट डिकीच्या --- कोर्ट डिक्री-- आधारे अर्जदाराच्या नावाने नगर परिषदेच्या अभिलेखात हस्तांतर करून नोंद घेण्यात यावी अशी विनंती केली आहे.

तरी सदरील घराच्या नोंदणी संबंधी कोणास आक्षेप असेल तर त्यांनी येत्या ७ (सात) दिवसाच्या आत नगर परिषद कार्यालयात कार्यालयीन वेळेत लेखी पुराव्यासह आक्षेप सादर करावेत. अन्यथा मुदतीनंतर अर्जदाराच्या नावाने खरेदी खता आधारर/कोर्ट डिक्रीच्या --कोर्ट डिक्री-- आधारे नगर परिषदेच्या अभिलेखात नोंद घेण्यांत येईल.

चार्तुसिमा :-पुर्वे:- विजयमाला तेलंग यांचे प्लॉट पश्चिमेस :- घाटे यांचे राहते घर दक्षिण :- विजयमाला तेलंग यांचे प्लॉट उत्तरेस :- १५ फुटाचा रस्ता

**मुख्याधिकारी**
**नगरनपरिष मुखेड**

## जाहीर पत्रक

**नगर पंचायत हिमायतनगर**

जा.क्र./६६४

**नाव परिवर्तन करणे बाबत**

**वार्ड क्र.१४ मामक्र/ ३२७/२**

या जाहिर प्रगटनाच्याअधारे सर्व जनतेस कळविण्यात येते की,हिना सय्यद कासीम रा. हिमायतनगर ता.हिमायतनगर यांनी या कार्यालयात अर्ज सादर केला आहे की, घर/दुकान/ प्लॉट ३२७/२ वार्ड नंबर १४ श्री.सिमा रियाजबेग मोगल च्या नावाने असलेले जायजाद यांनी खरेदी हिबानामा २०२५ दिनांक ३/४/२०२५ च्या विक्री घेतले आहे.किंवा वारसा हक्काने प्राप्त झाली आहे.तरी त्यांचे रजिस्ट्रर रिव्हीजन नगरपंचायत नोंद घेण्यात येत आहे. या संबंधी कोणास उजर असल्यास त्यांनी १५ दिवसाच्या आत आपला उजर योग्य पुराव्यासह लेखी दाखल करावा.नसता मुदत संपल्यावर अर्जदाराच्या नावे नोंद रजिस्ट्रर मध्ये नोंद घेण्यात येईल. चुर्तसिमा पुर्वे -हिना , पश्चिम: प्लॉट नंबर २६, दक्षिण : संगिता झरेवाड , उत्तर :१५ फुट रस्ता ,

**मुख्याधिकारी**
**नगरपंचायत हिमायतनगर**

जा. क्र. १२ /नपामु/२०२५
दि.१७/०४/२०२५

## जाहीर प्रगटन

मुखेड नगर परिषद मुखेड

विषय :- नांव परिवर्तन करणे बाबत.

या जाहीर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यांत येते की, अर्जदार श्री. १)काफीयाबी शेखलाल शेख,२) मेहबूब शेखलाल शेख,३) आमिन शेखलाल शेख मुखेडचे असुन मुखेड नगर परिषदेच्या हद्दीतील घर नं. २८९९ पै. वार्ड नं (०१) हे श्री. उमेश गणपतराव घाटे रा. मुखेड यांचे कडुन कायमचे खरेदी खत/कोर्ट डिक्री/ ----------- करुन घेतले असुन खरेदी खताची कोर्ट डिक्रीची/------- झेरॉक्स प्रत अनुसुची फॉर्म २ / अनुसुची फॉर्म ३ अर्जासोबत देऊन सदरिल घर या खरेदी खताआधारे/कोर्ट डिकीच्या --- कोर्ट डिक्री-- आधारे अर्जदाराच्या नावाने नगर परिषदेच्या अभिलेखात हस्तांतर करून नोंद घेण्यात यावी अशी विनंती केली आहे.

तरी सदरील घराच्या नोंदणी संबंधी कोणास आक्षेप असेल तर त्यांनी येत्या ७ (सात) दिवसाच्या आत नगर परिषद कार्यालयात कार्यालयीन वेळेत लेखी पुराव्यासह आक्षेप सादर करावेत. अन्यथा मुदतीनंतर अर्जदाराच्या नावाने खरेदी खता आधारर/कोर्ट डिक्रीच्या --कोर्ट डिक्री-- आधारे नगर परिषदेच्या अभिलेखात नोंद घेण्यांत येईल.

चार्तुसिमा-पुर्वे:- १५फुटाचा रस्ता पश्चिमेस -जागा क्रमांक ६१ दक्षिण :- जागा क्रमांक ६२ उत्तरेस :- २० फुटाचा रस्ता

**मुख्याधिकारी**
**नगरनपरिष मुखेड**

जा. क्र. १२ /नपामु/२०२५
दि.१७/०४/२०२५

## जाहीर प्रगटन

मुखेड नगर परिषद मुखेड

विषय :- नांव परिवर्तन करणे बाबत.

या जाहीर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यांत येते की, अर्जदार श्री. चंद्रकांत आप्पाराव शेळके रा. मुखेडचे असुन मुखेड नगर परिषदेच्या हद्दीतील घर नं. ५२६ पै. वार्ड नं (०५) हे श्री. विजया आनंदराव तेलंग रा. मुखेड यांचे कडुन कायमचे खरेदी खत/कोर्ट डिक्री/ ----------- करुन घेतले असुन खरेदी खताची कोर्ट डिक्रीची/------- झेरॉक्स प्रत अनुसुची फॉर्म २ / अनुसुची फॉर्म ३ अर्जासोबत देऊन सदरिल घर या खरेदी खताआधारे/कोर्ट डिकीच्या --- कोर्ट डिक्री-- आधारे अर्जदाराच्या नावाने नगर परिषदेच्या अभिलेखात हस्तांतर करून नोंद घेण्यात यावी अशी विनंती केली आहे.

तरी सदरील घराच्या नोंदणी संबंधी कोणास आक्षेप असेल तर त्यांनी येत्या ७ (सात) दिवसाच्या आत नगर परिषद कार्यालयात कार्यालयीन वेळेत लेखी पुराव्यासह आक्षेप सादर करावेत. अन्यथा मुदतीनंतर अर्जदाराच्या नावाने खरेदी खता आधारर/कोर्ट डिक्रीच्या --कोर्ट डिक्री-- आधारे नगर परिषदेच्या अभिलेखात नोंद घेण्यांत येईल.

चार्तुसिमा :-पुर्वे:- २० फुटाचा रोड पश्चिमेस :- प्लॉट नंबर १९ दक्षिण :- प्लॉट नंबर २५उत्तरेस :- १५ फुटाचा रस्ता

**मुख्याधिकारी**
**नगरनपरिष मुखेड**

## जाहीर पत्रक

**नगर पंचायत हिमायतनगर**

जा.क्र./६६६

**नाव परिवर्तन करणे बाबत**

**वार्ड क्र.९ मामक्र/४३४/१**

या जाहिर प्रगटनाच्याअधारे सर्व जनतेस कळविण्यात येते की,विठ्ठल गोविंद बोदलेवाड (अपाक सखी आई सारिका बोदलेवाड) रा.हिमायतनगर ता.हिमायतनगर यांनी या कार्यालयात अर्ज सादर केला आहे की, घर/दुकान/ प्लॉट ४३४/१ वार्ड नंबर ९ कै.गोविंद नानगु गोदलेवाडे च्या नावाने असलेले जायजाद यांनी शपथपत्र/ समंती पत्र २०२५ दिनांक ९ /४/२०२५ च्या विक्री घेतले आहे.किंवा वारसा हक्काने प्राप्त झाली आहे.तरी त्यांचे रजिस्ट्रर रिव्हीजन नगरपंचायत नोंद घेण्यात येत आहे. या संबंधी कोणास उजर असल्यास त्यांनी १५ दिवसाच्या आत आपला उजर योग्य पुराव्यासह लेखी दाखल करावा.नसता मुदत संपल्यावर अर्जदाराच्या नावे नोंद रजिस्ट्रर मध्ये नोंद घेण्यात येईल. चुर्तसिमा पुर्वे -मोकळी जागा , पश्चिम: रोड, दक्षिण :रोड , उत्तर :परमेश्वर बोदलेवाड ,

**मुख्याधिकारी**
**नगरपंचायत हिमायतनगर**

जा. क्र. १२ /नपामु/२०२५
दि.१७/०४/२०२५

## जाहीर प्रगटन

मुखेड नगर परिषद मुखेड

विषय :- नांव परिवर्तन करणे बाबत.

या जाहीर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यांत येते की, अर्जदार श्री. रमेश गणपतराव घाटे रा. मुखेडचे असुन मुखेड नगर परिषदेच्या हद्दीतील घर नं. ७९१ पै. वार्ड नं (०५) हे श्री. उमेश गणपतराव घाटे रा. मुखेड यांचे कडुन कायमचे खरेदी खत/कोर्ट डिक्री/ ----------- करुन घेतले असुन खरेदी खताची कोर्ट डिक्रीची/------- झेरॉक्स प्रत अनुसुची फॉर्म २ / अनुसुची फॉर्म ३ अर्जासोबत देऊन सदरिल घर या खरेदी खताआधारे/कोर्ट डिकीच्या --- कोर्ट डिक्री-- आधारे अर्जदाराच्या नावाने नगर परिषदेच्या अभिलेखात हस्तांतर करून नोंद घेण्यात यावी अशी विनंती केली आहे.

तरी सदरील घराच्या नोंदणी संबंधी कोणास आक्षेप असेल तर त्यांनी येत्या ७ (सात) दिवसाच्या आत नगर परिषद कार्यालयात कार्यालयीन वेळेत लेखी पुराव्यासह आक्षेप सादर करावेत. अन्यथा मुदतीनंतर अर्जदाराच्या नावाने खरेदी खता आधारर/कोर्ट डिक्रीच्या --कोर्ट डिक्री-- आधारे नगर परिषदेच्या अभिलेखात नोंद घेण्यांत येईल.

चार्तुसिमा :- पुर्वे:- कोंडीबा यांची जागा पश्चिमेस :- प्रतिवादी उमेश यांचा हिस्सा

दक्षिण :- विजय गायकवाड उत्तरेस :- रस्ता

**मुख्याधिकारी**
**नगरनपरिष मुखेड**

जा. क्र. १२ /नपामु/२०२५
दि.१७/०४/२०२५

## जाहीर प्रगटन

मुखेड नगर परिषद मुखेड

विषय :- नांव परिवर्तन करणे बाबत.

या जाहीर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यांत येते की, अर्जदार श्री. सुरज हनुमंतराव पुजलवार रा. मुखेडचे असुन मुखेड नगर परिषदेच्या हद्दीतील घर नं. ३२६३ वार्ड नं (०१) हे श्री. दिगांबर धोंडीबा बंडे रा. मुखेड यांचे कडुन कायमचे खरेदी खत/कोर्ट डिक्री/ ----------- करुन घेतले असुन खरेदी खताची कोर्ट डिक्रीची/------- झेरॉक्स प्रत अनुसुची फॉर्म २ / अनुसुची फॉर्म ३ अर्जासोबत देऊन सदरिल घर या खरेदी खताआधारे/कोर्ट डिकीच्या --- खरेदीखत-- आधारे अर्जदाराच्या नावाने नगर परिषदेच्या अभिलेखात हस्तांतर करून नोंद घेण्यात यावी अशी विनंती केली आहे.

तरी सदरील घराच्या नोंदणी संबंधी कोणास आक्षेप असेल तर त्यांनी येत्या ७ (सात) दिवसाच्या आत नगर परिषद कार्यालयात कार्यालयीन वेळेत लेखी पुराव्यासह आक्षेप सादर करावेत. अन्यथा मुदतीनंतर अर्जदाराच्या नावाने खरेदी खता आधारर/कोर्ट डिक्रीच्या --खरेदीखत-- आधारे नगर परिषदेच्या अभिलेखात नोंद घेण्यांत येईल.चार्तुसिमा :- पुर्वे:- प्लॉट नंबर १६ पश्चिमेस :- प्लॉट नंबर १४ दक्षिण :- प्लॉट नंबर २१ उत्तरेस :- रस्ता ६.१० मीटर

**मुख्याधिकारी**
**नगरनपरिष मुखेड**

## जाहीर पत्रक

**नगर पंचायत हिमायतनगर**

जा.क्र./६६९

**नाव परिवर्तन करणे बाबत**

**वार्ड क्र.१८**

**मामक्र/१५५,६२,६७,६८ १८,७१,७९,९७**

या जाहिर प्रगटनाच्याअधारे सर्व जनतेस कळविण्यात येते की,संजय सिद्धेश्वर कचर्लावार रा.हिमायतनगर ता.हिमायतनगर यांनी या कार्यालयात अर्ज सादर केला आहे की, घर/दुकान/ प्लॉट **१५५,६२,६७,६८, १८,७१,७९,९७** वार्ड नंबर १८ श्री.ओमकार संजय कचर्लावार अपाक सुजाता संजय कचर्लावार या नावाने असलेले जायजाद यांनी शपथपत्र २०२५ दिनांक ११/४/२०२५ च्या विक्री घेतले आहे.किंवा वारसा हक्काने प्राप्त झाली आहे.तरी त्यांचे रजिस्ट्रर रिव्हीजन नगरपंचायत नोंद घेण्यात येत आहे. या संबंधी कोणास उजर असल्यास त्यांनी १५ दिवसाच्या आत आपला उजर योग्य पुराव्यासह लेखी दाखल करावा.नसता मुदत संपल्यावर अर्जदाराच्या नावे नोंद रजिस्ट्रर मध्ये नोंद घेण्यात येईल. चुर्तसिमा पुर्वे -- , पश्चिम: -, दक्षिण : - , उत्तर : ,

**मुख्याधिकारी**
**नगरपंचायत हिमायतनगर**

जा. क्र. १२ /नपामु/२०२५
दि.१७/०४/२०२५

## जाहीर प्रगटन

मुखेड नगर परिषद मुखेड

विषय :- नांव परिवर्तन करणे बाबत.

या जाहीर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यांत येते की, अर्जदार श्री. मारोती विठ्ठलराव देवकते रा. मुखेडचे असुन मुखेड नगर परिषदेच्या हद्दीतील घर नं. १५३ पै. वार्ड नं (०८) हे श्री. पदमीनबाई विठ्ठलराव देवकते रा. मुखेड यांचे कडुन कायमचे खरेदी खत/कोर्ट डिक्री/ ----------- करुन घेतले असुन खरेदी खताची कोर्ट डिक्रीची/------- झेरॉक्स प्रत अनुसुची फॉर्म २ / अनुसुची फॉर्म ३ अर्जासोबत देऊन सदरिल घर या खरेदी खताआधारे/कोर्ट डिकीच्या --- कोर्ट डिक्री-- आधारे अर्जदाराच्या नावाने नगर परिषदेच्या अभिलेखात हस्तांतर करून नोंद घेण्यात यावी अशी विनंती केली आहे.

तरी सदरील घराच्या नोंदणी संबंधी कोणास आक्षेप असेल तर त्यांनी येत्या ७ (सात) दिवसाच्या आत नगर परिषद कार्यालयात कार्यालयीन वेळेत लेखी पुराव्यासह आक्षेप सादर करावेत. अन्यथा मुदतीनंतर अर्जदाराच्या नावाने खरेदी खता आधारर/कोर्ट डिक्रीच्या --कोर्ट डिक्री-- आधारे नगर परिषदेच्या अभिलेखात नोंद घेण्यांत येईल.

चार्तुसिमा :- पुर्वे:- रामराव श्रीरामे यांचे घर पश्चिमेस :- रस्ता दक्षिण :- रस्ता उत्तरेस :- निवृत्ती विठ्ठलराव देवकते यांचा हिस्सा

**मुख्याधिकारी**
**नगरनपरिष मुखेड**

जा. क्र. १२ /नपामु/२०२५
दि.१७/०४/२०२५

## जाहीर प्रगटन

मुखेड नगर परिषद मुखेड

विषय :- नांव परिवर्तन करणे बाबत.

या जाहीर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यांत येते की, अर्जदार श्री.१) गणेश तुकाराम बंडे २) हणमंत रामचंद्र तमशेट्टे रा. मुखेडचे असुन मुखेड नगर परिषदेच्या हद्दीतील घर नं. ३२६४ वार्ड नं (०१) हे श्री. दिगांबर धोंडीबा बंडे रा. मुखेड यांचे कडुन कायमचे खरेदी खत/कोर्ट डिक्री/ ----------- करुन घेतले असुन खरेदी खताची कोर्ट डिक्रीची/------- झेरॉक्स प्रत अनुसुची फॉर्म २ / अनुसुची फॉर्म ३ अर्जासोबत देऊन सदरिल घर या खरेदी खताआधारे/कोर्ट डिकीच्या --- खरेदीखत-- आधारे अर्जदाराच्या नावाने नगर परिषदेच्या अभिलेखात हस्तांतर करून नोंद घेण्यात यावी अशी विनंती केली आहे.

तरी सदरील घराच्या नोंदणी संबंधी कोणास आक्षेप असेल तर त्यांनी येत्या ७ (सात) दिवसाच्या आत नगर परिषद कार्यालयात कार्यालयीन वेळेत लेखी पुराव्यासह आक्षेप सादर करावेत. अन्यथा मुदतीनंतर अर्जदाराच्या नावाने खरेदी खता आधारर/कोर्ट डिक्रीच्या --खरेदीखत-- आधारे नगर परिषदेच्या अभिलेखात नोंद घेण्यांत येईल. चार्तुसिमा :- पुर्वे:- रस्ता ६.१० मी. रुंदीचा पश्चिमेस :- प्लॉट नंबर १६ दक्षिण :- प्लॉट नंबर २२उत्तरेस :- रस्ता ६.१० मीटर रुंदीचा

**मुख्याधिकारी**
**नगरनपरिष मुखेड**

## जाहीर पत्रक

**नगर पंचायत हिमायतनगर**

जा.क्र./६६८

**नाव परिवर्तन करणे बाबत**

**वार्ड क्र.१८**

**मामक्र/१२०,१२५,१२६,१३७**

या जाहिर प्रगटनाच्याअधारे सर्व जनतेस कळविण्यात येते की,संजय सिद्धेश्वर कचर्लावार रा.हिमायतनगर ता.हिमायतनगर यांनी या कार्यालयात अर्ज सादर केला आहे की, घर/दुकान/ प्लॉट **१२०,१२५,१२६,१३७** वार्ड नंबर १८ श्री.ओमकार संजय कचर्लावार अपाक आई सुजाता संजय कचर्लावार या नावाने असलेले जायजाद यांनी शपथपत्र २०२५ दिनांक ११/४/२०२५ च्या विक्री घेतले आहे.किंवा वारसा हक्काने प्राप्त झाली आहे.तरी त्यांचे रजिस्ट्रर रिव्हीजन नगरपंचायत नोंद घेण्यात येत आहे. या संबंधी कोणास उजर असल्यास त्यांनी १५ दिवसाच्या आत आपला उजर योग्य पुराव्यासह लेखी दाखल करावा.नसता मुदत संपल्यावर अर्जदाराच्या नावे नोंद रजिस्ट्रर मध्ये नोंद घेण्यात येईल. चुर्तसिमा पुर्वे -- , पश्चिम: -, दक्षिण : -, उत्तर-

**मुख्याधिकारी**
**नगरपंचायत हिमायतनगर**

## नगरपरिषद भोकर

## जाहीर प्रगटन

**नाव परिवर्तन करणे बाबत**

जा.क्र./नपभो/नानो६/१८६७

या जाहिर प्रगटनाअधारे सर्व जनतेस कळविण्यात येते की,निर्मलाबाई गोपाळराव कळपे यानी या कार्यालयात अर्ज सादर करून भोकर नगरपरिषद हद्दीतील शेत सर्व्हे नं.-- गट.नं.- २२ जुना वार्ड नं.- ३ मधील प्लॉट नंबर -- मालमत्ता नं.२३३४ नविन वार्ड नं.-३ नविन मालमत्ता नं.-४७४ साईज पपुर्व पश्चिम ३० फुट, दक्षिण उत्तर ४५ फुट, चुर्तसिमा पुर्वे -प्लॉट नंबर ७९, पश्चिम: प्लॉट नंबर ७७, दक्षिण :रोड, उत्तर :प्लॉट नंबर ४७, प्रकाश रामन्ना कुंडलवार यांच्या नावाने असलेली मालमत्ता खरेदी खता अधारे वारसा आधारे माझ्या नावे नाव परिवर्तन करण्यात यावे अशी विनंती संचिका सादर केली आहे. तरी त्यांचे नाव कर आकारणी नोंद वहित घेण्यात येत आहे. त्यासंबंधी कोणास काही आक्षेप असल्यास त्यांनी ७ दिवसांच्याआत लेखी पुराव्यासह अर्ज सादर करावा.अन्यथा मुदतीनंतर कुणाचे काहीही आक्षेप नाहीत असे गृहीत धरून खरेदीखताच्या अधारे त्यांच्या नावाने सदर मालमत्तेची नोंद कर आकारणी नोंदवहित घेण्यात येईल यांची नोंद घ्यावी.

**मुख्याधिकारी**
**नगरपरिषद भोकर**

## नगरपरिषद भोकर

## जाहीर प्रगटन

**नाव परिवर्तन करणे बाबत**

जा.क्र./नपभो/नानो६/१८४९

या जाहिर प्रगटनाअधारे सर्व जनतेस कळविण्यात येते की,सुरेश रघुनाथ काळे यानी या कार्यालयात अर्ज सादर करून भोकर नगरपरिषद हद्दीतील शेत सर्व्हे नं.-- गट.नं.- २८२ जुना वार्ड नं.- ५ मधील प्लॉट नंबर -११९ मालमत्ता नं.- डी-३०१/६ नविन वार्ड नं.१६ नविन मालमत्ता नं.१६३८/६ साईज पुर्व पश्चिम ४० फुट, दक्षिण उत्तर २० फुट, चुर्तसिमा पुर्वे -प्लॉट नंबर १८, पश्चिम: मोकळी जागा , दक्षिण : २० फुट रोड, उत्तर :१० फुट रोड दत्तात्र्य मोतीराम देशमुख यांच्या नावाने असलेली मालमत्ता खरेदी खता अधारे वारसा आधारे माझ्या नावे नाव परिवर्तन करण्यात यावे अशी विनंती संचिका सादर केली आहे. तरी त्यांचे नाव कर आकारणी नोंद वहित घेण्यात येत आहे. त्यासंबंधी कोणास काही आक्षेप असल्यास त्यांनी ७ दिवसांच्याआत लेखी पुराव्यासह अर्ज सादर करावा.अन्यथा मुदतीनंतर कुणाचे काहीही आक्षेप नाहीत असे गृहीत धरून खरेदीखताच्या अधारे त्यांच्या नावाने सदर मालमत्तेची नोंद कर आकारणी नोंदवहित घेण्यात येईल यांची नोंद घ्यावी.

**मुख्याधिकारी**
**नगरपरिषद भोकर**

## नगरपरिषद भोकर

## जाहीर प्रगटन

**नाव परिवर्तन करणे बाबत**

जा.क्र./नपभो/नानो६/१८५६

या जाहिर प्रगटनाअधारे सर्व जनतेस कळविण्यात येते की,प्रेमचंद विठ्ठलराव बनसोडे, माधव बाबुराव चव्हाण यानी या कार्यालयात अर्ज सादर करून भोकर नगरपरिषद हद्दीतील शेत सर्व्हे नं.-- गट.नं.- ४१२ जुना वार्ड नं.- ५ मधील प्लॉट नंबर -मालमत्ता नं.-ए-५५३ नविन वार्ड नं.१० नविन मालमत्ता नं.२६९४ साईज पुर्व पश्चिम २०.१२ मी, दक्षिण उत्तर १२.१९ मी, चुर्तसिमा पुर्वे -प्लॉट नंबर ४९, पश्चिम:रस्ता,दक्षिण :रस्ता,उत्तर:रस्ता अनुसयाबाई भगवानराव चिंचाळकर यांच्या नावाने असलेली मालमत्ता खरेदी खता अधारे वारसा आधारे माझ्या नावे नाव परिवर्तन करण्यात यावे अशी विनंती संचिका सादर केली आहे. तरी त्यांचे नाव कर आकारणी नोंद वहित घेण्यात येत आहे.त्यासंबंधी कोणास काही आक्षेप असल्यास त्यांनी ७ दिवसांच्याआत लेखी पुराव्यासह अर्ज सादर करावा.अन्यथा मुदतीनंतर कुणाचे काहीही आक्षेप नाहीत असे गृहीत धरून खरेदीखताच्या अधारे त्यांच्या नावाने सदर मालमत्तेची नोंद कर आकारणी नोंदवहित घेण्यात येईल यांची नोंद घ्यावी.

**मुख्याधिकारी**
**नगरपरिषद भोकर**

## टी.सी.हरवली

माझी सय्यद ताहेर बाबुमिया या नावाची डी.फार्म.पासची द्वितीय टि.सी. व मार्क मेमो नायगावं बस स्थानकामध्ये हरवली आहे. कोणाला सापडल्यास खालील पत्यावर संपर्क साधावा.

**-संपर्क पत्ता -**
**सय्यद ताहेर बाबुमिया**
**मो.९६७३५५१९००**

## टी.सी.हरवली

श्रद्धा संजय कुमार कासलीवाल या नावाची, प्रज्ञा निकेतन कॉलेज नांदेड या या कॉलेजची, बारावी पास २००५ ची टीसी नांदेड हदगाव प्रवासादरम्यान हरवली आहे.कोणाला सापडल्यास कृपया खालील नंबर वर संपर्क साधावा.

**-संपर्क नंबर-**
**जैन मंदिर तामसा ता.हदगाव जि.नांदेड मो.९८९०६३१००८**


**कुत्रीचे पिल्ले विकणे आहे**

डॉबर मॅन, जर्मन शेफर्ड, ग्रेडन, लेबरा डॉग, पामोलियन इत्यादी १२० प्रकारच्या जातीची कुत्रीचे पिल्ले मिळतील.



संपर्क गोपालअण्णा
डॉग डिलर
मोबाईल नंबर
९८५०६८८५२८

**दुकान नं. 8,10,11,12**

**ये है दुकान बेचना है**



संपर्क करे : सय्यद अलीम
8767009764
रा.बागवान गल्ली सराफा नांदेड


**तालुका सहकारी निवडणूक अधिकारी ता. कंधार जि. नांदेड**
**फरजाना कॉम्प्लेक्स, हुतात्मा स्मारकाजवळ, कंधार**
**पिन नंबर :- ४३१७१४ मेलआयडी - arcskandhar@gmail.com**

रासनिप्रा

जा.क्र. सनिससं, कंधार/कक्ष-३/क व ड वर्ग संस्था /निवडणूक/मतदार यादी प्रसिध्दी/-137-/२०२५ दिनांक :-1७ एप्रिल २०२५

**वाचा :-**

**विषय :- महाराष्ट्र सहकारी संस्था (समिती निवडणूक) नियम २०१४ अन्वये सहकारी संस्थांचे पंचवार्षिक निवडणूकी बाबत... ( क वर्गातील व ड वर्गातील संस्थाची कार्यक्रम)**

आपले सहकारी संस्थेच्या संचालक मंडळाची मुदत संपली असून सदर संस्थेची पंचवार्षिक निवडणूक घेणे कामी महाराष्ट्र सहकारी संस्था (समिती निवडणूक) नियम २०१४ मधील तरतूदी अन्वये संस्थेच्या अर्हता दिनांक वरील प्रारुप मतदार यादी प्राप्त झाली आहे. महाराष्ट्र सहकारी संस्था (समिती निवडणूक) प्रथम सुधारणा नियम २०१७ चे नियम ७६ (२) अन्वये संस्थेची प्रारुप मतदार यादी अंतिम मतदार यादी करण्याचा निवडणूक कार्यक्रम निश्चित करण्यात येवून खालील प्रमाणे प्रसिध्द करण्यात येत आहे.

| अ.क्र. | कार्यक्रम तपशिल | निश्चित केलेला दिनांक व वेळ | ठिकाण |
|---|---|---|---|
| १ | प्रारुप मतदार यादी प्रसिध्द करणे | २१.०४.२०२५ सकाळी ११.०० | तालुका सहकारी निवडणूक अधिकारी, कंधार व संबंधित संस्था कार्यालय यांचे नोटीस बोर्डावर |
| २ | प्रारुप मतदार यादी वरील आक्षेप / हरकत लेखी सादर करणे | २१.०४.२०२५ ते २८.०४.२०२५ सकाळी ११.०० ते ०३.०० | तालुका सहकारी निवडणूक अधिकारी, कंधार ( शासकिय सुटटीचे दिवस वगळून) |
| ३ | दाखल झालेले आक्षेप / हरकतीवर निर्णय घेणे | २९.०४.२०२५ सकाळी ११.०० | तालुका सहकारी निवडणूक अधिकारी, कंधार यांचे कार्यालय |
| ४ | अंतिम मतदार यादी प्रसिध्द करणे | ३०.०४.२०२५ सकाळी ११.०० | तालुका सहकारी निवडणूक अधिकारी, कंधार व संबंधित संस्था कार्यालय यांचे नोटीस बोर्डावर |

सोबत - संबंधित संस्थेची प्रारुप मतदार यादी

**(एम. एल. चौधरी)**
**तालुका सहकारी निवडणूक अधिकारी तथा**
**सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, कंधार**

**प्रत माहितीसाठी व कार्यवाहीस्तव**

सचिव / चेअरमन

१. कर्मवीर भाऊराव पाटील सहकारी कर्मचारी पतसंस्था मर्या., कुरुळा ता. कंधार, २. वैद्यनाथन ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्था मर्या., रुई ता. कंधार, ३. मजूर सहकारी संस्था मर्या., शेकापुर ता. कंधार, ४. जय अंबिका मजूर सहकारी संस्था मर्या., फुलवळ ता. कंधार , ५. लेबर कॉन्ट्रक्ट को ऑप कजूर सहकारी संस्था मया्र., बोरी (बु) ता. कंधार व ६. गैबी नागेंद्र महाराज मजूर सहकारी संस्था मर्या., नवघरवाडी ता. कंधार जि. नांदेड

आपणास निर्देशित करण्यात येते की, सदरचा कार्यक्रम व प्रारुप / अंतिम यादी आपल्या संस्थेच्या नोटीस बोर्डावर प्रसिध्द करावी व तसा अहवाल पंचयादीसह या कार्यालयास सादर करावा

**प्रत माहितीसाठी सविनय सादर -**

१. मा. जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक,सहकारी संस्था, नांदेड
२. मा. संपादक, दैनिक गोदातीर समाचार, यांना देवून विनंती की, सदरील निवडणूक कार्यक्रमास आपल्या दिनांक २१.०४.२०२५ रोजी प्रकाशित होणाऱ्या अंकामध्ये / वर्तमान पत्रामध्ये प्रसिध्दी देण्यात यावी ही विनंती.

**तालुका सहकारी निवडणूक अधिकारी तथा**
**सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, कंधार**

स्थलांतर
सिटी मॅक्स डिजिटल कलर
मो.7058766021,9422185282
गड्डम मार्केट,पहिला मजला, शिवाजी नगर,नांदेड

# गोदातीर समाचार

पेस्टोमॅटीक कंट्रोल सर्व्हीस
हर्बल ट्रिटमेंट
१६ वर्षांपासून नांदेडकरांच्या सेवेत...
किडे, मुंग्या, मुंगळे, झुरळ, पाल, उंदीर, ढेकून, साप, कबुतर, वाळवी, मधपोळे इत्यादींचा खात्रीशीर उपाय. कामाचा कुठलाही साईड इफेक्ट नाही. त्रास नाही, वास नाही.
पूर्णा रोड, बी.एस.एन.एल. ऑफिससमोर नांदेड
मो. 9284804221, 9637704308



## सहा महिन्यांचा पगार थकला, सफाई कामगार संपावर

### घाणीच्या वाढत्या साम्राज्याने नायगांव शहरातील स्वच्छतेचा बोजवारा

**नायगाव बाजार (प्रतिनिधी)–** कंत्राटदार कंपनीने गेल्या सहा महिन्यांपासून पगार न दिल्याने नायगांव येथील सफाई कामगार संपावर गेले आहेत. नगर पंचायतच्या दुर्लक्षामुळे शहरातील स्वच्छतेचा बोजवारा उडाल्याचे चित्र आहे. गल्लोगल्ली वाढत्या घाणीच्या साम्राज्याने दुर्गंधीने नागरिकांचे आरोगेय धोक्यात आले आहे. नगर पंचायतीवर एकहाती वर्चस्व असलेले खासदार रविंद्र चव्हाण यांनी हा प्रश्न सोडवावा, अशी मागणी होत आहे.

नायगाव शहरात स्वच्छता व साफ सफाईसाठी कंत्राट घेतलेल्या पल्लवी एंटरप्राइजेस कंपनीच्या गुत्तेदाराने कामगारांना चक्क पाच ते सहा महिन्यांची पगारच दिली नसल्याने कामगारांवर उपासमारीची वेळ आली आहे. साफसफाई करणारे २५ कामगार दि.१७ एप्रिल २०२५ पासून काम बंद आंदोलन सुरू केले असल्याने नायगाव शहरात घाणीचे सर्वत्र ढिगारे तयार झाले आहेत. नायगाव नगर पंचायत बद्दल नागरीकांतून तीव्र संताप व्यक्त केला जात आहे.

अनेक महीन्यांपासून कामगारांना पगार देतो म्हणत सहा महिने उलटले.शेवटी हातावर पोट असणारे कामगार पगारच मिळत नसल्याने कामगारांनी स्वच्छतेचे काम न करण्याचा निर्णय घेतला आहे. पगार मिळेपर्यंत कामावर न जाता संपावर जाण्याचा निर्णय घेतला आहे. एक हाती सत्ता असलेल्या नायगांव नगर पंचायतची चांगलीच तारांबळ उडाली आहे. पंचवीस ते तीस हजार लोकसंख्या असलेल्या नायगाव शहरातील साफसफाई कामगार आणि कर्मचाऱ्यांच्या या आंदोलनामुळे शहरातील नागरिकांपुढे स्वच्छतेची मोठी समस्या निर्माण झाली आहे.

नायगाव शहरातील प्रत्येक वार्डातील घराघरात जावून घंटागाडीच्या माध्यमातून कचरा जमा करणारे वाहने येणे बंद झाले असल्याने घरात साठवलेल्या सुखा ओल्या कचऱ्याचे काय करायचे? कुठे टाकायचा? हा प्रश्न येथील सर्व गृहिणींना सतावत आहे.

या बरोबरच शहरातील नाली सफाईचे काम ठप्प झाल्याने गल्ली बोळातील नाल्या तुंबल्या आहेत. परिणामी दुर्गंधीमुळे डासांचा प्रादुर्भाव वाढला आहे. नागरिक त्रस्त झाले असून नायगाव नगर पंचायत बद्दल तीव्र संताप व्यक्त केला जात आहे.

## रेल्वे विभागाने मोठ्या भुयारी पुलाचे काम त्वरित सुरू करावे –आ.भीमराव केराम

**किनवट (प्रतिनिधी)–** रेल्वे प्रशासनाने किनवट - आदिलाबाद रेल्वे मार्गावर मोठ्या पुलाचे काम आधी पूर्ण करावे. त्यानंतरच छोट्या पुलाचे काम हाती घेणे आवश्यक होते. परंतु, गेट कायमस्वरूपी बंद करुन सध्या छोट्या पुलाचे काम सुरू केले आहे. यामुळे ६ गावांतील ग्रामस्थांसह स्थानिकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. प्रशासनाने आधी मोठ्या पुलाचे काम हाती घ्यावे, अन्यथा तीव्र आंदोलन करू, असा इशारा आ.भीमराव केराम यांनी दिला आहे.

याबाबत रेल्वे प्रबंधक व राष्ट्रीय अनुसूचित जनजाती आयोगाला दिलेल्या निवेदनात आ.केराम यांनी नमूद केले आहे की, किनवट शहराच्या पूर्व भागाकडे जाणारा आणि सात-आठ गावांना जोडणारा मुख्य रस्ता हा हजारो नागरिकांसाठी दैनंदिन वापराचा आहे. या रस्त्यावरील रेल्वे गेट काढून केंद्र सरकारच्या धोरणानुसार भुयारी पूल बांधण्याचे काम सुरू आहे. दक्षिण मध्य रेल्वे नांदेड विभागाने दोन भुयारी पूल बांधण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांकडे नाहरकत मागितले होते. त्यानुसार जिल्हाधिकाऱ्यांनी नाहरकत प्रमाणपत्र दिले.



लहान भुयारी पूल कि.मी. ११७ । २- ३ हे रेल्वे गेटच्या ठिकाणी आहे. तर मोठा भुयारी पूल किमी ११७/६-७ अवजड वाहनांसाठी माहूर-किनवट राष्ट्रीय महामार्गाला जोडणाऱ्या बैल बाजार ते बेलोरी डी.पी. मार्गावर आहे. सध्या रेल्वे गेट बंद करून लहान भुयारी पूलाचे काम सुरू आहे. मात्र, या पुलाची उंची आणि रुंदी अपुरी असल्याने स्थानिक नागरिकांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. मोठ्या भुयारी पुलाची निविदा अद्याप काढली नसल्याने आणि पर्यायी रस्त्याची व्यवस्थाही न केल्याने नागरिकांना विशेषतः महिला, मुले आणि ज्येष्ठांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. या भागातील वाहतूक व्यवस्था कोलमडली असून, दैनंदिन कामांसाठी शहरात ये-जा करणे कठीण झाले आहे.

आपण यापूर्वी तत्कालीन खासदार हेमंत पाटील यांच्यासह रेल्वे प्रशासनाला पत्र लिहून मोठा भुयारी पूल प्राधान्याने बांधून त्याद्वारे वाहतूक सुरू केल्यानंतरच रेल्वेगेट बंद करण्याची विनंती केली होती. मात्र, रेल्वे प्रशासनाने याकडे दुर्लक्ष करत थेट रेल्वेगेट बंद करून लहान पुलाचे काम सुरू केले. यामुळे स्थानिक नागरिकांचा रोष वाढला आहे.

**राष्ट्रीय अनुसूचित जनजाती आयोगाची नोटीस**

आमदार केराम यांनी ७ एप्रिल रोजी राष्ट्रीय अनुसूचित जनजाती आयोगाकडे रेल्वे प्रशासनाच्या चुकीच्या कार्यपद्धतीविरोधात लेखी तक्रार दाखल केली. आयोगाचे वरिष्ठ अन्वेषक गोवर्धन मुंडे यांच्या पाठपुराव्यामुळे आयोगाने तत्काळ कारवाई करत ८ एप्रिल रोजी नांदेड जिल्हाधिकारी, दक्षिण मध्य रेल्वेचे महाव्यवस्थापक जैन आणि नांदेड विभागाचे व्यवस्थापक प्रदीप कमले यांना नोटीस बजावली. या नोटीसमध्ये १५ दिवसांत खुलासा मागविण्यात आला असून, वेळेत उत्तर न दिल्यास समन्स जारी करण्याचा इशाराही देण्यात आला आहे.

**आंदोलनाची शक्यता**

किनवट - माहूर राष्ट्रीय महामार्गाला जोडणाऱ्या बैल बाजार ते बेलोरी डी.पी. मार्गावरील मोठ्या भुयारी पुलाची निविदा काढून कामाला सुरुवात न झाल्यास तीव्र आंदोलनचा इशारा निवेदनातून देण्यात आला आहे.

## भाजप किनवट शहराध्यक्षपदी स्वागत आयनेनीवार; उत्तर मंडळाध्यक्ष कऱ्हाळे, दक्षिणचे अरंडकर



**किनवट (प्रतिनिधी)–** किनवट शहर मंडळाध्यक्षपदी स्वागत आयनेनीवार यांची, तर किनवट उत्तर मंडळच्या अध्यक्षपदी उमाकांत पाटील कऱ्हाळे व दक्षिण मंडळाध्यक्षपदी माजी जि.प.सदस्य सूर्यकांत आरंडकर यांच्या नियुक्तीची घोषणा रविवारी दि. २० करण्यात आली.

किनवट शहर तसेच दक्षिण, उत्तर मंडळाच्या अध्यक्ष निवडीसाठी पक्षनिरीक्षक प्रा.किशन मिराशे यांच्या अध्यक्षतेखाली दि.२५ मार्च रोजी गोकुंदा विश्रामगृहात बैठक घेण्यात आली होती. तीन जागेसाठी १९ इच्छुकांनी अर्ज दाखल केले होते.त्यानंतर पक्षश्रेष्ठीने रविवारी स्वागत आयनेनीवार, उमाकांत पाटील कऱ्हाळे व सूर्यकांत आरंडकर यांच्या नियुक्तीची घोषणा केली. नियुक्ती जाहीर होताच शहराच्या जिजामाता चौकात भाजप कार्यकर्त्यांनी फटाक्यांची आतिषबाजी केली. यावेळी नवनियुक्त पदाधिकाऱ्यांसह पक्षनिरीक्षक प्रा.किशन मिराशे यांच्यासह व्यंकटराव नेम्मानीवार, अशोक नेम्मानीवार, बाबूराव केंद्रे, आनंद मच्छेवार, विभीषण पाळवदे, विश्वास कोल्हारीकर, शिवा क्यातमवार, ॲड. माज बडगुजर, शिवा आंधळे, नरेश सिरमनवार आदींची उपस्थिती होती.

## मुदखेड भाजपच्या शहराध्यक्षपदी रामसिंग चव्हाण, तर तालुकाध्यक्ष दत्तू देशमुख यांची निवड

**मुदखेड (प्रतिनिधी)–** भारतीय जनता पक्षाच्या मुदखेड तालुका अध्यक्षपदी दत्तु देशमुख वाडीकर तर शहर अध्यक्ष पदी रामसिंघ चव्हाण यांची निवड करण्यात आली आहे. संघटन पर्व मोहीमेत नव्यां चेहऱ्यांना संधी देण्यात आली आहे.

माजी मुख्यमंत्री खासदार अशोकराव चव्हाण, आमदार श्रीजया चव्हाण तसेच माजी आमदार अमिता चव्हाण यांचे कट्टर समर्थक म्हणून दोन्ही मंडळ अध्यक्ष परिचीत आहेत.



जिल्हा अध्यक्ष ॲड. किशोर देशमुख, गोविंदराव शिंदे, महामंत्री प्रविण गायकवाड, सभापती संजय देशमुख, गांधी, पवार, मारोती किरकण यांच्या प्रमुख उपस्थितीत निवडणूक अधिकारी विनोद चिंचाळकर यांनी ही घोषणा केली. यावेळी माजी नगराध्यक्ष सुनिल शेटे, मनोज कमटे, माधव कदम, संजय सोनटके, संजय कोलते, भिमराव कल्याणे, कान्होबा बिसमिले, कोमल जयस्वाल आदींसह अनेक कार्यकर्ते उपस्थित होते. या निवडीचे जोरदार स्वागत करण्यात आले.

## अग्निशमन सेवा सप्ताहानिमित्त वाहनांची जनजागृती रॅली संपन्न



**नांदेड (प्रतिनिधी)–** महानगरपालिका अग्निशमन विभागामार्फत जनजागृती करण्याच्या दृष्टीने रविवार दि. २० एप्रिल रोजी अग्निशमन वाहनांची रॅली काढण्यात आली. या रॅलीला अतिरिक्त आयुक्त गिरीश कदम यांनी हिरवी झेंडी दाखविल्यानंतर राज कॉर्नर येथून रॅलीला सुरुवात झाली.

ही रॅलीने श्रीनगर, आयटीआय, अण्णाभाऊ साठे चौक, जुना मोंढा, वजिराबाद या मार्गे मार्गक्रमण केले. या रॅली दरम्यान ठिकठिकाणच्या चौकांमध्ये रॅलीतील अग्निशमन कर्मचाऱ्यांनी जनजागृती पॉम्पलेटचे नागरिकांमध्ये वाटप केले. रॅलीचा समारोप शिवाजीनगर मार्गे फुले मार्केट, लेबर कॉलनी अग्निशमन विभाग या ठिकाणी करण्यात आला. नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका अग्निशमन अधिकारी के. एस. दासरे यांच्या नियोजनाखाली अग्निशमन सेवा सप्ताह २०२५ अंतर्गत अग्निशमन वाहनांच्या रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. संपूर्ण कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीत रॅलीची सांगता करण्यात आली.

## 'ऑपरेशन फ्लॅश आऊट' अंतर्गत २२४ वाहनांची तपासणी

**नांदेड (प्रतिनिधी) –** पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी सूरू केलेल्या ऑपरेशन फ्लॅश आऊट अंतर्गत २० एप्रिल रोजी पहाटे ४ ते ८ या वेळेत शहरात वाहन व गुन्हेगारांची तपासणी करण्यात आली. यामध्ये पोलिसांनी २२४ वाहनांची तपासणी करून ३ हजार रुपये दंड वसूल केला.

शहरात अवैध व्यवसाय तसेच गुन्हेगारीवर अंकुश ठेवण्यासाठी पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांच्या मार्गदर्शनाखाली ऑपरेशन फ्लॅश आऊट अंतर्गत मोहीम राबविण्यात आली. यामध्ये पोलिसांनी १६६ गुन्हेगारांची चौकशी करण्यात आली.



तर २२४ वाहनांची तपासणी करून ३ हजार रुपये दंड वसूल करण्यात आला.

यावेळी अटक केलेले, पाहिजे व फरार आरोपींची तपासणी करण्यात आली. तर भारतीय हत्यार कायद्यानुसार दोघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या मोहिमेत ३१ पोलिस अधिकारी, १३६ अंमलदार यांच्यासह अप्पर पोलीस अधीक्षक सूरज गुरव यांच्यासह उपविभागीय पोलिस अधिकारी, स्थानिक गुन्हे शाखा, प्रभारी पोलीस अधिकारी व अंमलदारांचा समावेश होता.

## 'एनएमएमएस' परीक्षेत शेळगाव (धा) शाळेतील सात विद्यार्थिनींचे यश

**लोहा (प्रतिनिधी)–** तालुक्यातील शेळगाव (धा) येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील तब्बल सात विद्यार्थिनींनी (एनएमएमएस) परिक्षेत घवघवीत यश संपादन केले. यात कु.लक्ष्मी छत्रपती भुजबळ ही खुला प्रवर्गातून जिल्ह्यात १२ वी आली. कु. साक्षी दत्ता नेरनाळे ही ओबीसी प्रवर्गातून जिल्ह्यातून १२ वी आली. तर कु.सुमती महालिंग टोने हिने एसबीसी प्रवर्गातून जिल्ह्यात द्वितीय क्रमांक पटकावला.

एनएमएमएस ही आठवीच्या विद्यार्थ्यांसाठी राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धात्मक परीक्षा होय.सरील शाळेच्या ७ विद्यार्थ्यांनी यश संपादन केल्याबद्दल त्यांचा व गुरूवर्यांचा दि.१७ एप्रिल रोजी राजर्षी शाहू शिक्षक पतसंस्थेचे माजी चेअरमन तथा सेवानिवृत्त मुख्याध्यापक बी. वाय. चव्हाण यांच्या वतीने विद्यार्थिनींनाच शाल, पुष्पहार व लेखणी भेट देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी शिक्षण विस्ताराधिकारी सर्जेराव टेकाळे, पत्रकार सेवा संघाचे तालुकाध्यक्ष शिवराज पवार, मुख्याध्यापक सी. एन. मुलुकपाडे, सहशिक्षक जाधव ए. व्हि., ढवळे डी. के., केंद्रे डब्ल्यू. ए., अंबेकर एस.व्ही., मगर एन. ए., बिरादार जी.जी., सहशिक्षिका सौ. पालमकर पी. पी., मादसवार एस.ए. यांची प्रमुख उपस्थिती होती.

विद्यार्थीप्रिय आदर्श शिक्षक तथा सेवानिवृत्त मुख्याध्यापक बी. वाय. चव्हाण यांनी अध्यक्षीय समारोप केला.

## शोभायात्रा व धर्मसभेला बिलोलीत उत्स्फूर्त प्रतिसाद

**बिलोली (प्रतिनिधी)–** हिंदू एकता दिवस व श्रीराम जन्मोत्सव सोहळ्याचे निमित्त सकल हिंदु समाजाच्या वतीने दि. १८ एप्रिल रोजी शहरातील बागेतील हनुमान मंदिर ते आठवडी बाजार मैदानापर्यंत प्रभु श्रीराम व हनुमानाच्या मुर्ती, सजीव देखावे व भक्ती गितांच्या तालावर वाजत गाजत शोभायात्रा काढण्यात आहे. त्यानंतर धर्म सभा पार पडली. या सभेला भक्तांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

या धर्मसभेस साध्वी सरस्वतीती दिदी यांनी लव जिहाद, महिला संरक्षण, गोहत्या, लँन्ड जिहाद अशा विविध विषयांवर मार्गदर्शन केले. यावेळी राजशेखर शिवलींग शिवाचार्य महाराज अहमदपुरकर, डॉ.विरूपाक्ष शिवाचार्य महाराज मुखेडकर, खासदार डॉ.अजित गोपछडे, लक्ष्मण ठक्करवाड यांची उपस्थिती होती.

### धर्मसभेला साध्वी सरस्वतींनी केले संबोधित



शहरातील कुंडलवाडी मार्गावर असलेल्या बागेतील हनुमान मंदिर येथे श्रीराम व हनुमंताच्या आरतीने सुरूवात करण्यात आली. या शोभा यात्रेत भगवान श्रीराम व हनुमंताची भव्य अशी प्रतिकृती ठेवण्यात आली होती. तर देवाधीदेव महादेव, वानर सेना व राक्षक सेनेच्या सजिव देखाव्यांसह भक्ती गितांच्या तालावर शोभायात्रा काढण्यात आली. बागेतील हनुमान मंदिर, बाजार गल्ली, जुने बस स्थानक, गांधी चौक, विठ्ठल मंदिर, शिवशक्ती गल्ली मार्गे बडुर मार्गावरील दुर्गा माता मंदिराजवळ असलेल्या आठवडी बाजार मैदानावर शोभायात्रा पोहोचल्यानंतर तिचे धर्मसभेत रुपांतर झाले. या धर्म सभेस राजशेखर शिवलिंग शिवाचार्य महाराज अहमदपुरकर, डॉ.विरूपाक्ष शिवाचार्य महाराज मुखेडकर, खा. अजित गोपछडे, साध्वी सरस्वती दिदी यांनी मार्गदर्शन केले.

शोभायात्रे दरम्यान उप जिल्हा रूग्णालयासमोर थंड पाणी, जुने बस स्थानक परिसरात थंड पाणी व मठ्ठा तर गांधी चौकात सर्व भक्तांना मठ्याचे वाटप करण्यात आले.

### महिला मुलींना शास्त्र आणि शस्त्र दोन्हीची माहिती असणे आवश्यक –साध्वी सरस्वती दिदी

देशभरातील वातावरण पाहता अनेक ठिकाणी मुलींना प्रेमाच्या जाळ्यात अडकवून त्यांची मोठ्या निर्घृण हत्या केल्याच्या घटना घडल्या आहेत. अशा परिस्थितीत हिंदू महिलांना स्वयंपाक करता येवो अथवा न येवो, पण महिलांना शस्त्र आणि शास्त्र या दोन्हीची माहिती असणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन साध्वी सरस्वती यांनी धर्मसभेला संबोधित करताना केले. पुढे बोलताना साध्वी म्हणाल्या की, काही जण 'राम मंदिर वहीं बनाएंगे पर तारीख नही बतायेंगें' असे म्हणत होते. मात्र आत्ताच्या सक्षम सरकारमुळे राम मंदिर अयोध्येतच झाले आणि त्या भव्य मंदिराचे उद्घाटनही झाले आहे. आता मथुरा आणि काशी बाकी असून तेही पूर्ण होईल, अशी अपेक्षा त्यांनी यावेळी व्यक्त केली.



## सिताराम राठोड यांचे निधन

**लोहा (प्रतिनिधी) –** लोहा तालुक्यातील मौजे विठोबा तांडा माळाकोळी येथील ज्येष्ठ नागरिक सिताराम आनुदास राठोड (वय ९० वर्षे) यांचे रविवारी दि. २० एप्रिल रोजी प्रदिर्घ आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात ४ मुले, ३ मुली, असा परिवार आहे. लोहा येथील जिल्हा परिषद बांधकाम विभागाचे उपविभागीय अभियंता शिवाजी राठोड यांचे ते वडील होते. सिताराम राठोड यांच्या पार्थिवावर सोमवारी दि. २१ एप्रिल रोजी सकाळी १० वाजता अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत.

**Godateer Samachar** हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.
फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड-(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४ / मुंबई ९९६७०६२३५४
ईमेल: godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com